14 TO 20 FEBRUARY 2022 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 12/02/2022 8:34 PM Page 1

CMYK

|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : ८ सोमवार दि. १४ फेब्रुवारी २०२२ ते रविवार दि. २० फेब्रुवारी २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ झाला आईच्या मदतीने बापाचा खून केला

मुंबई/क्राईम रिपोर्टर

माणसे आजकाल इतकी माथेफिरू बनत चालली आहेत कि शुल्लक कारणावरुनही त्यांना प्रचंड राग येतो आणि रागाच्या भरात मग नात्यागोत्याचा सुद्धा विचार करीत नाहीत. कारण त्यांच्यातली माणुसकी संपून पशु जागा झालेला असतो आणि या पशुला रक्ताचे नातेही ओळखता येत नाही. त्यामुळे बाप मुलाचा आणि मुलगा बापाचा खुन करतो. अंधेरी येथील अशाच एका घटनेत बँक अधिकारी असलेला पती घरात पैसे देत नाही. कामात आळस ...पान ६ वर

## गुप्तधनाचे आमिष दाखवून तो पैसे लुटायला गेला फसवणूक झालेल्या भक्तांच्या हातून भोंदूबाबा मेला

तासगाव/क्राईम रिपोर्टर



मयत अवधूत शिंदे

देशाला स्वातंत्र्य मिळून सात दशके उलटली तरी सुद्धा या देशातील लोकांना श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातला फरक कळलेला नाही. त्यामुळे जादूटोणा, भूतप्रेत, जारण मरण, करणी यासारख्या गोष्टींवर अजूनही लोक विश्वास ठेवतात. त्यांच्या याच अंधश्रद्धेमुळे ढोंगी बाबा, भुरटे भगत आणि कुडमुडे ज्योतिषी यांची दुकानदारी सुरु आहे आणि कधी देवाची तर कधी दुष्ट आत्म्यांची भीती दाखवून हे हरामखोर ढोंगी भोंदूबाबा लोकांना लुबाडत आहेत. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनाचे मोठे कार्य झाले. दाभोलकर, शाम मानव आणि इतर समाजसुधारकांनी अंध श्रद्धेच्या विरोधात रान उठवले आणि सरकारला जादूटोणा विरोधी कायदा करण्यास भाग पाडले. पण सत्तेत बसलेल्या देव भोळ्यांचा अजूनही ढोंगी बाबांच्या चमत्कारांवर विश्वास आहे. हिंदू धर्मातील जुनाट रुढी परंपरा आणि कर्म कांडांना त्यांची मूकसंमती आहे. त्यामुळे भोंदू बाबांची आणि कार मधून फिरणाऱ्या व्हाईट कॉलरवाल्या अध्यात्मिक बाबांची दुकाने सुरु आहेत. त्यामुळे जादूटोणा विरोधी कायदा अस्तित्वात असूनही त्याची अंमलबजावणी होत नाही. परिणामी बिचारे गरीब मध्यमवर्गीय भोंदू बाबांकडून नडले जात आहेत. त्यांचे आर्थिक शोषण केले जात आहे. तर या बाबांकडे जाणाऱ्या महिलांचे लैंगिक शोषण केले जात आहे. गुप्तधनाची लालसा दाखवून हे भोंदूबाबा लोकांना नरबळी द्यायला भाग पाडीत आहेत. तासगाव तालुक्यातील धामणीमध्ये अशाच एका भोंदू बाबाने गुप्तधन मिळवून देण्याची लालच दाखवून काही लोकांकडून पैसे घेतले होते. पण गुप्तधन काही मिळाले नाही. उलट ज्यांचे या भोंदू बाबाने पैसे घेतले होते ते पैसे परत मागायला लागले. पण बाबा पैसे देईना. त्यामुळे बाबांना पैसे दिलेल्या तिघांनी या भोंदू बाबाची तिरडी बांधली आणि गुप्तधन घेण्यासाठी त्याला सरळ वर पाठवले. या प्रकरणी पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली आहे.



तासगाव तालुक्यातील धामणी येथे अवधूत शिंदे हा आपल्या कुंटूंबासह राहयला आहे. त्याच्या घरची परिस्थिति तशी सधन असून तो देवदेवर्षी करीत होता. आपल्याकडे येणाऱ्याना तो आपल्या परीने त्याच्या अडचणीतून मार्ग सांगत होता. पाडळी येथील आनंदराव पाटील हा त्याचे परिचयाचा होता. तो त्याचेकडे नेहमी येत जात असल्याने अवधूत शिंदे हा अनेकांना त्याचे अडचणीतून मार्ग सांगत असतो तसे तो आपल्याला ही आपल्या अडचणीतून मार्ग सांगेल असे आनंदराव पाटील याना वाटत होते. त्याच्या घरची परिस्थीती ही सधन असली तरी अलिकडच्या काही एक दोन वर्षात ते आपल्या आर्थिक परिस्थिने बेजार झाले होते. त्यामुळे त्याना पैशाची फार अडचण होती. तसे तर कितीही आर्थिक पस्थिीती सधन असली तरी प्रत्येकाला या ना त्या कारणातून पैसे ही लागतच असतात. त्यामुळे तो पैसा कसा ही आणि कुठून ही मिळाला तरी तो चालत असतो ही दुनियादारीच सगळी पैशाच्या मागे धावत असल्याने पैसा कसा ही मिळवायचा हा ज्याचा त्याचा प्रश्न असल्याने कुणाला आयतेच पैसे पाहिजे असल्याने ते अशा देवदवर्षी करणाऱ्याच्या मागे धावत असतात. आनंदराव पाटील हे त्यातीलच एक होते. अवधूत हा त्याचा मित्र असल्याने त्याने आपल्या अडचणीतून मार्ग काढणेसाठी त्याला विचारले असता अवधुत याने त्याला त्याचा हात पाहून तुला तर फार मोठे घबाड मिळण्याची ...पान २ वर

## सिगारेटवरून झालेला वाद जीवघेणा ठरला टपोरी तरुणांनी रिक्षावाल्याचा गळा चिरला



मयत विनोद सिंग



बोईसर/क्राईम रिपोर्टर

आजकाल लोकांना पोलिसांचा आणि कायद्याचा सुद्धा धाक राहिलेला नाही. त्यामुळे शुल्लक कारणावरून सुद्धा एखादा माणूस इतका चिडतो कि समोरच्या माणसाचा जीव घ्यायलाही मागे पुढे पाहत नाही. खास करून आजकाल तरुण मुलांची टोळकी गुन्हेगारीकडे वळलेली असल्याने आपला धाक जमवण्यासाठी हे तरुण कुठल्याही थराला जातात. बोईसरमध्ये रात्रीच्यावेळी दुकान बंद करीत असताना एका तरुणाला दुकानदाराने सिगारेट दिली नाही म्हणून तो इतका चिडला कि त्याने आपल्या दहा पंधरा साथीदारांना बोलावून दुकानदाराची हत्या केली. ज्यांची हत्या करण्यात आली ते नालासोपारा येथील रिक्षा युनियनचे अध्यक्ष होते. त्यांच्या हत्येमुळे नालासोपाऱ्यात मोठी खळबळ माजली असून या प्रकरणी बोईसर पोलिसांनी ७ जणांना अटक केली आहे.

सिगरेट न दिल्याच्या कारणावरुन दुकानदाराची हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दुकान बंद झाल्यानंतर सिगरेट न दिल्यावरुन दुकानदाराचा आरोपीशी वाद झाला होता. यावेळी दुकानदाराचा गळा चिरुन जीव घेण्यात आला. पालघर जिल्ह्यातील बोईसर वारंगडे गावात हा प्रकार घडला. अवघ्या दहा रुपयांच्या सिगरेटवरुन झालेल्या वादावादीतून दुकानदाराला प्राण गमवावे लागले. तर दुकानदाराच्या बचावासाठी मध्ये पडलेले तिघे जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. नालासोपारा येथील रिक्षा युनियनचे अध्यक्ष विनोद सिंग यांचा मृत्यू झाला आहे. बोईसर पोलीस ठाण्यात या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर ७ आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तीन जखमी व्यक्तींवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

बोईसर पूर्व भागात वारांगडे गावात सतेंद्रकुमार याचे किराणामालाचे दुकान आहे. त्याच्यासोबत त्याचे रिक्षाचालक वडील विनोद सिंग हे काही महिन्यांपूर्वी राहायला आले होते. रविवारी रात्री साडे नऊ वाजता गावातील तीन ते चार तरुण किराणा मालाच्या दुकानाजवळ आले. त्यांनी सतेंद्रकुमार याच्याकडे सिगारेटची मागणी केली. मात्र दुकान बंद झाल्याचं सांगत त्याने सिगरेट देण्यास नकार दिला. सिगरेट न दिल्यामुळे चिडलेल्या तरुणांनी सतेंद्रसोबत बाचाबाची केली. मात्र वादानंतर ते निघून गेले. ...पान ६ वर

## वखवखलेल्या मामीची भूख होती विखारी पतीला मारण्यासाठी भाच्याला दिली सुपारी

वर्धा/क्राईम रिपोर्टर



आरोपी



आरोपी

विवाहित बाईला नवऱ्याकडून जर मनासारखं शरीर सुख मिळाल नाही, तर मग तिची चंचल नजर दुसरा तगडा पुरुष शोधू लागते. अशावेळी तिच्या अनैतिक संबंधात पतीचा अडसर निर्माण होतो. त्यामुळे मग याराच्या मदतीने ती पतीचा जीव घ्यायलाही मागे पुढे पाहत नाही. वर्धा जिल्ह्यातील आष्टीत राहणाऱ्या दीपालीने सुद्धा तेच केले. दारुडा नवरा त्या कामात कमी पडल्याने तिने शुभम नावाच्या तरुणाला जवळ केले आणि मग पतीला मार्गातून हटवण्यासाठी चक्क भाच्यालाच २० हजाराची सुपारी देऊन पतीचा काटा काढला. मात्र पोलिसांनी या प्रकरणी तिन्ही आरोपींना अटक केली आहे.

वर्धा जिल्हयातील आष्ठी येथे जगदीश देशमुख हे पत्नी दीपाली सह राहयला आहेत.त्याच्या लग्नाला कमीत कमी १५ वर्षहून होऊन गेली होती. त्याचा संसार बऱ्यापैकी चालला होता. दीपाली ही दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने तिला तिच्या सौंदर्याचा अभिमान होता. तिच्यापुढे तिचा नवरा हा जगदीश काहीच नव्हता. तो बिचारा सरळ आणि गरीब मनाचा होता. ...पान २ वर

## बिल्डर पती लागला होता बारबालांच्या नादी पत्नीला जाळून केली त्याने आयुष्याची बरबादी



मयत सुवर्णा

नाशिक/क्राईम रिपोर्टर

पती जर बाहेरख्याली असेल तर सुखी संसार उध्वस्त व्हायला वेळ लागत नाही. नाशिकमध्ये राहणार बांधकाम व्यावसायिक संदीप वाजे हा बाहेरख्याली होता. त्यामुळे डॉक्टर असलेल्या पत्नीसोबत त्याचे पटत नव्हते. सगळा पैसा बार आणि इतर व्यसनांमध्ये उधळायचा. त्याला पत्नीचा विरोध असल्याने संदीपला संसारात पत्नीचा अडसर वाटू लागला आणि एकेदिवशी तिला कारसह त्याने जिवंत जाळून टाकले आणि आपल्यावर संशय येऊ नये म्हणून स्वतःच पत्नी बेपत्ता झाल्याची पोलीस ठाण्यात मिसिंगची फिर्याद नोंदवली. मात्र या शातीर दिमाग आरोपीचा पोलिसांनी पर्दाफाश करून त्याला ताब्यात घेतले असून या गुन्ह्यात त्याला साथ देणाऱ्या त्याच्या ५ साथीदारांचा पोलीस तपास करीत आहेत.



नाशिक शहरातील कर्मयोगी नगरात डॉ. सुवर्णा वाजे आपल्या पतीसह रहात होत्या. त्यांचे पती संदीप वाजे हे बांधकाम व्यावसायीक आहेत. डॉ. सुवर्णा वाजे व त्यांचे पती संदिप वाजे यांच्यात वैचारिक मतभेद होते. दोघांचे आपसात जमत नव्हते. त्याला कारण म्हणजे संदिप वाजे यांना काही फालतू षोक होते. त्यांना डान्स बारमधे जाण्यासह काही नाजुक छंद होते. त्यामुळे त्यांचे पत्नीसोबत पटत नव्हते. याउलट डॉ. सुवर्णा या आपल्या वैद्यकीय सेवेशी आणि घरगुती कामासोबत प्रामाणिक होत्या. नाशिक महानगरपालिकेच्या श्री स्वामी समर्थ रुग्णालयात त्या रुग्णसेवा बजावत होत्या. कोविड काळात त्यांची कामगिरी उत्कृष्ट होती. त्यामुळे त्या आपल्या नोकरीच्या जागी लोकप्रिय होत्या. मात्र प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी २०२२ रोजी डॉ. सुवर्णा संदीप वाजे यांची कार आग्रा रस्त्यावरील रायगड नगरनजीक रस्त्याच्या बाजुला जळीत अवस्थेत आढळून आली. ...पान २ वर

## दोघांमधील वाद पोलिसांपर्यंत गेला माथेफिरुच्या हातून समाजसेवक मेला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



मयत सुरेश गडगे

सामाजिक क्षेत्रात काम करणे दिवसेंदिवस धोकादायक बनत चालले आहे. कारण ते ज्यांच्याविरुद्ध आवाज उठवतात त्यांच्यापासून त्यांच्या जीवाला कधी धोका निर्माण होईल हे सांगता येत नाही. इचलकरंजीमध्ये भ्रष्टाचार विरोधी जनशक्ती आघाडीचे काम पाहणारे सुरेश गाडगे यांचा एका माथेफिरू अभियंत्याबरोबर शुल्लक कारणावरून वाद झाला आणि या वादातून त्याच्यावर गुन्हा दाखल होऊन त्याला अटक झाली. या गोष्टीचा राग मनात ठेऊन त्याने अत्यंत निर्घुणपणे त्या समाजसेवकाची हत्या केली. मात्र पोलिसांनी या माथेफिरूला अटक केली आहे.

इचलकरंजीतील सामाजिक कार्यकर्ते सुरेश गडगे याचा धारदार हत्याराने खून करण्यात आला. ही घटना मंगळवार दि.८ फ्रेब्रुवारी रोजी रात्री ९ते १०च्या दरम्यान ते राहत असलेल्या इंदिरा हौसिंग सोसायटीत घडली. या घटनेने इचलकरंजी शहर परिसरात खळबळ उडाली नाही तर नवलच. कारण मागील काही वर्षापूर्वी ही इचलकरंजी शहरातील दत्ता पाटील या सामाजिक कार्यकर्त्याचा खून अशाच पध्दतीने आयको जवळ करण्यात आला होता. त्यानंतर त्याचे पाठोपाठ सुरेश गडगे याचा खून परवा झाल्याने सामाजिक कार्य करणाऱ्या खून का आणि कशासाठी केला जात ...पान ६ वर

## दारूच्या पैशावरून दोघांमध्ये वाद झाला जिवलग मित्रानेच मित्राचा खून केला

नंदुरबार/क्राईम रिपोर्टर

दारू माणसाच्या डोक्यात गेली कि मग त्याचा स्वतःवर ताबा राहत नाही. दारूच्या नशेत मित्र, नातेवाईक यापैकी पिणाऱ्याला कोणाचीही ओळख राहत नाही. अशावेळी त्याच्या तोंडून काही वेडेवाकडे निघाले कि दारूच्या पार्टीत हाणामारी होते आणि मग त्यातून एखाद्याचा जीवही जातो. नंदुरबार जिल्ह्याच्या ढेकाटी-वाल्हेरी गावात दोन जिवलग मित्र दारूची पार्टी करीत होते. यावेळी दारूचे पैसे देण्यावरून त्यांच्यात वाद झाला आणि या वादात जो क्रिमिनल मित्र होता त्याने जिवलग मित्राची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



राजु नाईक या तरुणाचा एक मित्र होता. उदेसिंग वसावे असे त्याचे नाव होते. नंदुरबार जिल्ह्याच्या तळोदा तालुक्यातील ढेकाटी-वाल्हेरी या आदिवासी भागात राजु आणि उदेसिंग हे दोघे मित्र रहात होते. दोघांना दारु पिण्याचे व्यसन होते. दारुची नशा चढली म्हणजे उदेसिंग आपले होश हरवून जात असे. मग त्याला कसले भान रहात नव्हते. त्याच्या मनाविरुद्ध काही झाले म्हणजे तो दारुच्या नशेत काहीतरी चुकीचे कृत्य करत असे. २२ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान कडाक्याच्या थंडीचा कहर सुरु असतांना काम संपवून राजू नाईकचे वडील सुरुपसिंग नाईक हे घरी परत निघाले होते. त्यांना ढेकाटी-वाल्हेरी शिवारातील एका शेताच्या बांधावर, नर्मदानगर पुर्नवसन क्र.१ परिसरातील आट्या पुजारा याच्या शेताजवळ एका तरुणाचा रक्ताच्या थारोळ्यात पालथ्या अवस्थेत पडलेला एक मृतदेह दिसला. जखमी अवस्थेतील भरपूर रक्तस्राव झालेल्या तरुणाचा ...पान २ वर

## अफाट पैसा मिळवण्याचा नोकराचा फंडा मालकालाच घातला त्याने ८ कोटींचा गंडा

मुंबई/एस.कुमार

आयुष्यात प्रत्येक गोष्टीचा फायदा घ्यावा, पण कोणाच्या विश्वासाचा फायदा घेऊ नये. कारण एकदा विश्वासाला तडा गेला की, भरवशाच्या माणसांवर देखील माणसे विश्वास ठेवायला घाबरतात. विश्वास ही अशी गोष्ट आहे जी तयार व्हायला वर्ष लागतात पण तुटायला वेळ लागत नाही. तुम्ही कोणावर कितीही विश्वास ठेवा पण ज्याच्या रक्तात बेईमानी आहे. तो एक दिवस बेईमानी करणारच. मुंबईतील व्यापाऱ्याच्या बाबतीत असाच काहीसा प्रकार घडला आहे. ज्या नोकरवर मालकाने विश्वास टाकला त्यानेच मालकाचा विश्वासघात केला. दक्षिण मुंबईतील भुलेश्वर, दुसरी फोपळवाडी, मुरती हॉटेलजवळ राजमहल नावाची बिल्डिंग आहे. या बिल्डिंगच्या चौथा माळ्यावर जेनीशा ज्वेल्स आर्ट प्रा. लिमिटेड या सोन्याचे दागिन्यांचे कार्यालय आहे.



खुशाल रसीकलाल टामका (४८) यांच्या मालकीचे हे कार्यलय असून त्यांच्या कार्यलयात नोकरचाकर आहेत. कार्यालयात मोजकेच माणसे काम करतात. तरी पण टेमका याची उलाढाल काही कोटीच्या घरात आहे. कारण येथे सोन्याचे दागदागिने ठेवले जातात. सोन्याचे व्यपारी व जवाहिर या कार्यालयातून सोने विकत घेतात व गिऱ्हाईकांना विकतात. १४ जानेवारी २०२२ हा दिवस जेनीशा ज्वेल्स आर्ट प्रा. लिमिटेड कार्यालयासाठी नेहमीचीच धावपळ घेऊन सुरू झाला. बहुतेक कार्यालय सकाळ पासून सुरू होत असले तरी जेनीशा ज्वेल्स आर्ट प्रा. लिमिटेड कार्यालयाचे काम दहा वाजल्या पासून सुरू होते. त्यादिवशी कार्यलयात विश्वासु नोकर गणेशकुमार हिराराम देवासी (२१) व त्याचा साथीदार रमेश प्रजापती तसेच त्यांचे इतर ३ साथीदार कामावर उपस्थित होते. हा गेले सहा महिने येथे कामाला आहे. सकाळी १० वाजता येऊन सारी साफसफाई त्याला करावी लागले. त्यामुळे कारखान्याच्या ...पान ६ वर

CMYK

14 TO 20 FEBRUARY 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 12/02/2022 8:34 PM Page 1



पान १ वरून....

## गुप्तधनाचे आमिष दाखवून तो पैसे लुटायला...

शक्यता आहे. तुझ्या हातात गुप्तधनाची रेषा आहे. तुला गुप्तधन मिळू शकते असे सांगितल्यावर आनंदराव पाटील याना गुप्त धनाची लालसा झाली. ते गुप्तधन मिळविणेसाठी काय करावे लागेल आणि ते कोठे मिळेल असे विचारल्यावर अवधूत याने ते गुप्त धन तुला तुझ्या घरच्या भिंतीत सापडेल त्यासाठी फार काही प्रयत्न करावे लागणार नाहीत मी तुला ते गुप्तधन मिळवून देतो पण यासाठी काही रक्कम मला अगोदर दयावी लागेल त्यानंतरच मी तुला ते गुप्तधन मिळवून देईन असे सांगितले. गुप्तधन मिळविणेसाठी आनंदरावची काही ही करण्याची तयारी होती. म्हणून त्यांनी त्याला तो मागेल तेवढी रक्कम देण्याचे ठरविले होते. आपल्या प्रमाणे आपल्या मित्रांना ही त्यांनी गुप्तधनाची लालसा दाखविली. त्यांनी अवधूत शिंदे याचे कडे नेवून त्याना ही गुप्त धन मिळवून देण्याची विनंती केली. आनंदराव यांनी आपले मित्र घोटी खुर्द येथील तुषार बाळू कुंभार,आणि सातारा तालुक्यातील आबंवडे येथील अमोल विठ्ठल कारंडे यांना ही अवधूत शिंदे यांची भेट घालून दिली. अवधुत शिंदे हे गुप्तधन शोधून आणि ते मिळवून देण्यात माहीर आहेत काही थोडक्या रक्कमेत ते आपल्याला गुप्तधन शोधून देतात असे सांगून या दोघांनाही त्यांनी अवधूत शिंदे याना पैसे देण्यास भाग पाडले. त्या तिघांना ही त्यांनी ऑगस्ट २०२१च्या मध्यात लाखाच्या घरात रक्कम दिली होती. आपल्याला गुप्तधन मिळाले की आपण श्रीमंत होवू आपण मस्तपैकी आपले आयुष्य जगू असे त्यांनी स्वप्न रंगावयला सुरूवात केली. आनंदराव पाटील हे साठीच्या आसपासचे होते. तर तुषार कुंभार आणि अमोल कारंडे हे तीसीच्या जवळपासचे होते. या तिघांना ही गुप्तधनाची आशा होती. म्हणून तर ते तिघे ही अवधूत शिंदे याच्या गळाला लागलेले होते. अवधूतला ते तिघे ही गुप्तधन दाखवा आणि ते मिळवून दया म्हणून पाठ लागलेले होते. अवधूतने त्याचेकडून पैसे घेतले असल्याने तो त्याना तुमचे काम करतो पण जरा सुबरीने घ्या कारण गुप्तधन मिळवायचे तर त्यासाठी काही विधी कराव्या लागतात त्या पुर्ण झाल्या की मी तुम्हाला गुप्त धनाची जागा दाखवितो तेथे तुम्ही खोदकाम करा आणि गुप्त धन घ्या असे सांगितले. त्यावर ते तिघे ही गप्प बसले होते. प्रत्येकवेळी अवधूत हा त्याना आमवश्या प्रौर्णिमा याचे कारण देत त्याना तुमच्यासाठी विधी करतोय त्यात मला ते दिसले की मी तुम्हाला त्या गुप्तधनाची जागा दाखवितो असे सांगत टोलवत होता. ते ही त्याचे प्रत्येकवेळी ऐकून घेवून गप्प बसत होते. अशातच दोन चार महिने निझून गेले तरी ही अवधूत शिंदे हा त्याना काही गुप्तधन मिळवून देईना तशी जागा ही त्याना दाखवेना त्यामुळे आनंदराव पाटील याना त्याची शंका येवू लागली. ते अलिकडे त्याला मला गुप्त धन मिळवून तरी दे नाही तर आम्ही दिलेले पैसे तरी परत दे म्हणून मागे लागलेले होते. पण अवधूत शिंदे हा त्याना चांगलाच भारी पडलेला होता. तो त्याना गुप्तधन ही मिळवून देत नव्हता. किंवा त्याने त्याचेकडून घेतलेले पैसे ही परत करत नव्हता.त्यामुळे आनंदराव पाटील तुषार कुंभार आणि अमोल कारंडे हे त्याचेवर चिडून होते. हा आपल्याला सारखा उल्लू बनवित आहे याला काही तरी धडा शिकवालाच पाहिजे म्हणून त्यानी विचार केला. सरळ मार्गाने जर अवधूत शिंदे याने घेतलेले पैसे परत दिले नाहीत तर त्याला चांगलीच अद्दल घडवायची यासाठी त्यानी आपल्या कटात वैभव सकट, लखन ठोंबरे आणि अण्णा नावाच्या एका व्यक्तीला सामावून घेतले. त्यांनी गोड बोलून अवधत शिंदे याला ७ डिसेंबर २०२१ रोजी संध्याकाळी नागज घाटात कामानिमित्य बोलावून घेतले. कवठेमहंकाळ तालुक्यातील नागज घाटातील काही भाग हा फॉरेस्ट विभागात येत असल्याने तो भाग तसा निर्मनुष्य आहे. या भागात रात्रीच्यावेळी वर्दळ तशी कमीच असते.आनंदराव पाटील यांनी तेथे बोलावल्यावर अवधूत शिंदे हा तेथे आपल्या बुलेट गाडीवरून गेला होता. तेथे पोहचल्यावर अवधूत बरोबर आनंदराव पाटील हे त्याला गुप्तधनाबाबत विचारू लागले त्यात त्या दोघांची तेथे वादावादी सुरू झाली. भरीत भर म्हणून त्या ठिकाणी असणारे पाटील याचे मित्र तुषार कुंभार, अमोल कारंडे, वैभव सकट लखन ठोबरे यांनी त्याला दमबाजी देत त्याचे अंगावर जात तु आमचे पैसे दिला नाहीस तर तुला आता ठेवतच नाही म्हणून मारहाण करू लागले तसे तर अवधूत याला धडा शिकवायचाच या तयारीनेच ते सर्वजण तेथे आले होते. त्यांनी अवधुत याला गाडीवरून खाली पाडून लाथाबुक्क्यांनी तुडवायला सुरूवात केली त्याचवेळी तुषार कुंभार आणि अमाले कारंडे यांनी त्याचेडोक्यावर आपल्याकडील लोंखडी रॉडने जोरात प्रहार केला. त्याचे डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. अवधूत हा ओरडतच खाली पडला. मर साल्या म्हणत त्यांनी परत त्याचेवर वार केला. त्यासरशी तो उठलाच नाही. त्याचा जागीच मृत्यू झाला. या कामात यांना वैभव सकट, लखन ठोंबर आणि आण्णा यांनी देखील मदत केली. आपल्या हातून अवधूत शिंदे याचा खून झाल्याचे त्याचे लक्षात आल्यावर ते सर्वजण घाबरले. त्यांनी त्याचा मृतदेह त्या निर्जन ठिकाणावरून ओढून आणून घाटातील रस्त्याकडेला टाकला. त्याच्या बाजुलाच त्यांनी त्याची बुलेट गाडी लावली. जेणेकरून त्यांनी त्याचा अपघातात मृत्यू झाल्याचे भासविले. आणि तेथून त्यांनी पोबारा केला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या मार्गवरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना रस्त्याकडेला एका तरूणाचा मृतदेह पडला असल्याचे दिसल्यावर त्यांनी त्या घटनेची माहिती तासगाव पोलीसाना दिली. पोलीसांनी घटनास्थळी दाखल होवून घटनेची पाहणी केली असता त्याना ही तो अपघात झाल्याचेच वाटत होते. पोलीसांनी मयताची ओळख पटवून तपासाला सुरूवात केली. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कवठेमंहाकाळ रुग्णालयात पाठवून दिला. शवविच्छेदन रिपोर्टमध्ये मयताच्या जड हत्याराने वार केल्याने मृत्यू अशी नोंद केलेली होती.यावरून पोलीसांनी मयत अवधूत शिंदे याचा कुणी तरी अज्ञात कारणातून खून केल्याची शक्यता वर्तवून पुढील तपासाला सुरूवात केली. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना मयत अवधूत शिंदे हा देवदवर्षी करीत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. म्हणून पोलीसांनी त्याचे सर्पकात कोण कोण येत होते याची माहिती काढली.या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वषणचे पोलीसही करत होते. घटना घडून दोन तीन महिने होत आले तरी या घटनेतील मारेकरी पोलीसाना सापडत नव्हते. त्याच्या मार्गावर पोलीसाची दोन पथके होती. वेगवेगळया ठिकाणी पोलीस त्याचा शोध घेत होते.या कामासाठी पोलीसांनी आपल्या गुप्त खबऱ्याना ही कामाला लावले होते. अखेर तीन महिन्यांनी गुप्त खबऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी अवधूत शिंदे याच्या खूनात आनंदराव पाटील याचा हात असल्याची माहिती मिळाली. आनंदराव पाटील यांना मयत अवधूत शिंदे याने गुप्त धन मिळवून देण्याचे अमिष दाखविले होते. त्याबद्दल्यात त्यांनी त्याला मोठी रक्कम ही दिली होती. या अनुषंगाने पोलीसांनी आनंदराव पाटील याना ताब्यात घेवून त्याचेकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. या घटनेत त्याचे साथीदार तुषार कुंभार,अमोल कारंडे हे देखील सहभागी असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीसांनी त्यांना ही ताब्यात घेतले होते. त्याचेकडे ही चौकशी केली असता त्यांनी अवधुत शिंदे याच्या खूनाची कबुली दिली. या घटनेतील वैभव सकट, लखन ठोंबरे आणि आण्णा नावाची व्यक्ती फरार होती. पोलीस त्याचा शोध घेत होते. मयत अवधूत शिंदे याच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी अवधूत सोपन शिंदे रा.धामणी तासगाव याच्या खूनप्रकरणी आनंदराव पाटील (५७), तुषार कुंभार (२७) आणि अमोल कारंड (२२) आणि वैभव सकट, लखन ठोंबर, आण्णा याच्या विरोधात, भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून यातील आनंदराव पाटील, तुषार कुंभार आणि अमोल कारंडे याना मा.कोटासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान त्याचेकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल, लोखंडी रॉड जप्त केले. उर्वरीत तीन जणांचा पोलीस शोध घेत होते.

## वखवखलेल्या मामीची भूख होती ...

तर दीपाली ही चालू आणि तितकीच बेरकी होती. तिचा स्वभाव हा हट्टी आणि भांडखोर होता. त्यामुळे त्या दोघा नवरा बायकोत कधीच पटत नव्हते. शिवाय अलिकडे रात्रीच्या खेळात जगदीश हा बेडवर कमी पडत होता. त्यातच तो दारू पिऊन आला की, लगेच आडवा होत होता. त्यामुळे दीपालीची पोटाखालची आग शांत होत नव्हती. तशी ती चालू असल्याने सावज शोधत असताना नवऱ्याचा मित्र शुभम जाधव हा त्याच्या घरी येत होता. त्याचेवर पडली होती. ती त्याला चोरून पाहत असताना तो ही तिला त्याच नजरेतून पाहत होता. बघता बघता त्या दोघांच्या इश्काचा खेळ सुरू झाला होता. शुभम तिला वहिनी वहिनी म्हणत होता. त्याचे मनात वहिनी वहिनी म्हणत कधी एकदा दीपालीची मांडी दाबून तिला आपल्या अंगाखाली घेतो असे झाले होते. दीपाली त्याला आवडली होती. तो तिच्याशी लगट करीत बोलत होता. ती त्याला भावोजी म्हणत असल्याने ती ही त्याला बोलता बोलता इशारे करीत असल्याने तिच्या मनात काय आहे हे त्याने ओळखले होते. म्हणूनच तो मित्र जगदीश नसताना तिच्या कडे येत होता. तो तिला आपल्या अंगाखाली घेण्यासाठी संधी शोधत असताना एकदा घरी कुणी नसताना त्यांला तशी संधी मिळाली. दीपाली किचनरुममध्ये असताना त्याने तिला पाठीमागून जावून मिठी मारली होती. त्यावेळी तिने खोटा नखरा आणीत भावोजी सोडा मी तुमच्या मित्राची बायको आहे, तुम्हला हे शोभत नाही असे म्हणाली, पण त्याने तिच्या मनातील ओळखले असल्याने तिच्या नितंबावरून हात फिरवित तो तिच्या नाजुक अवयवांना दाबत होता. तशी ती ही घायतीला आली असल्याने ती ही त्याला रिस्पॉन्स देवू लागली. बघता बघता दोघांच्या अंगावरील कपडे बाजुला झाले होते. तगडा शुभम तिला भारी आवडला असल्याने ती ही त्याला त्या खेळात खेळवू लागली होती.तो तिच्या नागडया अंगावर पडून रोमान्स करीत तिला खाली वर करीत होता.त्याचा तगडा बाबुराव बघुन ती चेकाळलीच होती. तो तिच्या नागडया अंगावर पडून धक्के मारत होता. तशी ती चित्कारत होती. त्याचा दणका तिला सहन होत नव्हता. त्या खेळात तो माहीर असल्याचे बघून ती त्याला आपल्या अंगावर ओढून घेऊ लागली होती. त्याने तिला दिवसा चांदणे मोजायला लावल्यावर ती त्याची दिवानी झाली. त्यावेळेपासून ते दोघे ही शारीरिक सुख घेत होते. जगदीश घरी नसताना तो घरी येवून जगदीशची कसर भरून काढत होता. त्या दोघांच्या संबंधाची चर्चा ही ते राहत असलेल्या ठिकाणी होत होती. ही चर्चा जगदीशच्या कानावर आल्यावर त्याने याचा जाब दीपालीला विचारला असता ती त्याचेबरोबर भांडण काढत त्याच्याच उणीवा शोधत त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवले होते. बऱ्याचवेळेला भांडणात जगदीशने तिला शुभमचा नाद सोड म्हणून सांगितले होते पण ती काही त्याचे ऐकत नव्हती. उलट तुम्ही मला नको आहे. मला तोच पाहिजे म्हणत होती. दोघा नवरा बायकोची भांडणे वाढल्यावर त्या भांडणात शुभम हा मध्यस्थी करीत दीपालीची बाजू घेत जगदीशला बोलत होता. त्याला मारहाण करायला जात होता. ती तुझी बायको असली तरी मी तिला ठेवून घेतले आहे आणि येथून पुढे ती माझ्यासोबत राहणार आहे असे सांगितले. त्यानंतर बायकोच्या बदफैली वागण्याने जगदीश हा जास्तच दारू पित होता. त्यातच महिन्या दोन महिन्यांनी दीपाली ही त्याला सोडून शुभम जाधव बरोबर पळून गेली.मित्रानेच आपल्या बायकोला पळवून नेल्याचे बघून जगदीश हतबल झाला.तो रात्री आणि दिवस दारूच्या नशेत राहू लागला. शुभने तिला पळवून नेले तरी त्याच्या राहण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. म्हणून त्या दोघांनी एक खोली भाडयाने घेणेचे ठरविले. ऐक ठिकाणी त्यांनी भाडयाची खोली बघितली. पण तो घरमालक नवरा बायको असेल तरच भाडयाने खोली देणार असे म्हणून लागला आणि त्याने त्याच्याकडे लग्नाचा दाखला मागितला. त्यावर त्यादोघांनी त्या घर मालकाला गंडवून आम्ही दोघे नात्याने बहिण भाऊ आहोत असे सांगून ती खोली भाडयाने मिळविली. त्या खोलीत ते दोघे एकत्र राहत असल्याने तो तिच्या नागडया देहाचा पुरेपुर फायदा घेत उपभोगत होता. त्यांला ही मित्राची बायको फुकटच त्या कामासाठी मिळाली होती.त्या दोघाच्या वागण्या बोलण्यात राहणीमात कुठेच भाऊ बहिणीचा लवलेश नव्हता. याची कल्पना त्या घरमालकाला आल्यावर त्याने त्याना ती खोली सोडण्यास सांगितले. काही दिवसांनी त्यांनी ती खोली सोडल्यावर तो त्याच्या घराकडे गेला.तर ती परत नवऱ्याकडे आली.ती आपले तोंड काळे करून आली तरी ती काही आपला हेका सोडत नव्हती. उलट नवऱ्यालाच गप्प बसवित होती.तिच्या अशा वागण्याने समाजात नात्यात पै-पाहुण्यात त्याची अब्रु तर गेलीच होती. त्यामुळे तो तिला काहीच बोलत नव्हता. दिवस रात्र दारू पिऊन येवून घरात भांडण काढत होता. त्यामुळे ती ही त्याला भांडणात नको नको ते बोलत होती.तुझ्यात दम असता तर मी का सोयरा बघितला असता असे ती त्याला म्हणत होती. ती बाहेर तोंड काळे करून आल्याने तिला नात्यात पै-पाहुण्यात काहीच किमंत नव्हती. तरी ही ती मी नाही त्यातली म्हणत शुभम जाधव बरोबर संबंध ठेवून होती. तिला आता त्या कामात नवरा नकोच होता. त्यामुळे तिला नवऱ्याचा आपल्या त्या संबंधात अडसर वाटत होता. हा अडसर कायमचा दूर केला तर आपल्यांला शुभमबरोबर मजा मारता येईल म्हणून तिने शुभमला नवरा जगदीशचा कायमचा काटा काढ असे सांगितले त्यावेळी त्याने हे काम माझ्या एकटाने होणार नाही आणखी कोण तरी बरोबर पाहिजे असे सांगितले. त्यावेळी तिच्या नजरेसमोर या कामासाठी आपला भाचा विजय माने हा आला. विजय हा जगदीशच्या बहिणीचा मुलगा होता.तिने त्याला आपल्या हाताशी धरून त्याला तुझा मामा मला खूप त्रास देतो मला त्याचेपासून सुटका पाहिजे. त्यासाठी त्याला संपव मी तुला २०हजार रूपये देते म्हणून सांगितले आणि त्याला ती रक्कम त्या कामासाठी दिली. तो ही २० हजार रूपये काही वेळात मिळतात म्हणून त्या कामासाठी तयार झाला. त्याचप्रमाणे त्याला आपल्या मामीचे शुभमबरोबरचे लफडे माहित होते. म्हणून तो त्या कामासाठी तयार झाला. घटनेच्या आदल्या दिवशी जगदीशची आई म्हणजे मथुरा देशमुख हया आपल्या मुलीच्या घरी गेल्या होत्या. त्यामुळे घरात जगदीश आणि दीपाली हे दोघेचे होते. त्या रात्री तिने जेवणाचा बेत करून शुभम याला जेवायला बोलावले त्याचबरोबर भाचा विजय माने याला देखील बोलावले. सुरूवातीला त्या चौघांनी मनसोक्त गप्पा मारल्या. त्यानंतर शुभम आणि जगदीश यांनी मनसोक्त दारू प्यायली. त्यानंतर जेवण करून झाल्यावर जगदीश हा आपल्या खोलीत झोपायला गेला. त्यानंतर विजय माने आणि शुभम यांनी त्याचेवर हल्ला करून त्याच्यां अंगावर चाकूने सपासप वार केले.त्यासरशी त्याच्या शरीरातून रक्ताच्या धारा लागल्या त्यांनी त्याला ओरडण्याची ही संधी दिली नाही.त्याची हालचाल मंदावत असताना त्यांनी त्याच्या गुप्त अंगावर जोराची लाथ मारली तर दीपालीने त्याचे गुप्तअंग जोरात पिळले त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा आपल्या हातून खून झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी त्याच्या मृतदेहाची कशी विल्हेवाट लावायची असा ते विचार करीत होते. त्यांनी याचा विचार करून त्याच परिसरातील एका शिक्षकाच्या दरवाज्यात त्याचा मृतदेह एका पोत्यात भरून नेऊन टाकला. दुसऱ्या दिवशी ही घटना उघडकीस आल्यावर या घटनेची माहिती आष्ठी पोलीसाना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पोत्यातून मृतदेह बाहेर काढून पंचनामा करून मृतदेहाची ओळख पटवून शवविच्छेनसाठी पाठवूनद दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना मयत जगदीश देशमुख याच्या पत्नी विषयी पोलीसाना समजले होते. तिचे शुभम जाधव या तरूणाबरोबर विवाहबाहय संबंध असून हे संबंध मयत जगदीशला मान्य नव्हते. त्यातून त्यांनी त्याची हत्या केल्याची माहिती पोलीसांना मिळाली. संशयावरून पोलीसांनी दीपाली देशमुख हिला ताब्यात घेतले. तिच्याकडे जगदीशच्या हत्येविषयी चौकशी केली असता ती पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होती. तिच्या बोलण्यात पोलीसाना विसंगती जाणवत असल्याने पोलीसांनी तिला महिला पोलीसा करवी पोलीसी खाक्या दाखविला असता तिने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती दिली.तिने आपल्या गुन्हयाची कबुली दिल्यावर पोलीसांनी या घटनेतील तिचा प्रियकर शुभम जाधव आणि भाचा विजय माने याना ताब्यात घेऊन अटक केले. त्यांनी ही आपल्या गुन्हयाची कबुली दिली. मयत जगदीश याच्या आईने दिलेल्या फिर्यादी नुसार पोलीसांनी जगदीश देशमुख याचा खून करून पुरावा नष्ट केल्यां प्रकरणी मयत जगदीश देशमुख याची पत्नी दीपाली देशमुख आणि तिचा प्रियकर शुभम जाधव,भाचा विजय माने याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.

## बिल्डर पती लागला होता बारबालांच्या ...

त्या जळीत कारमधे एका महिलेचा जळीत अवस्थेत मृतदेह देखील आढळून आला. या घटनेची माहिती परिसरात समजताच खळबळ माजली. या घटनेच्या आदल्या दिवशी त्यांचे पती संदीप वाजे यांनी अंबड पोलीस स्टेशनला पत्नी सुवर्णा वाजे या बेपत्ता असल्याची खबर दिली होती. त्यांनी दिलेल्या खबरीत त्या मंगळवारी २५ जानेवारी रोजी नेहमीप्रमाणे रुग्णसेवा बजावण्यासाठी गेल्या होत्या. मात्र त्या घरी आल्या नाही. तत्पुर्वी त्यांचे पती संदीप वाजे यांनी त्यांना फोन केला असता आपण कामावर आहोत असा मॅसेज त्यांना आला होता. त्यानंतरही त्या घरी आल्या नाही. त्यानंतर रात्री एक वाजेच्या सुमारास संदीप वाजे यांनी अंबड पोलीस स्टेशनला डॉ. सुवर्णा वाजे बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी पुढील तपासाला सुरुवात केली. दरम्यान बुधवार दि. २६ जानेवारी रोजी वाडीव-हे पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आग्रा रोडवरील रायगडनगर जवळ रस्त्याच्या कडेला चार चाकी वाहनात पूर्णत जळालेल्या अवस्थेत मिळून आली. त्यामध्ये एका महिलेचा सांगाडा पोलिसांना मिळून आला. संपूर्ण चार चाकी गाडी जळालेली होती आणि त्यात महिलेचा जळालेला सांगाडा मिळून आला. ही गाडी कोणाची आहे हे पोलिसांनी सर्वप्रथम शोधले असता ती कार डॉ. सुवर्णा वाजे यांचीच असल्याचे निष्पन्न झाले. पण गाडीमध्ये मिळालेला सांगाडा कुणाचा आहे हे वैद्यकीय तपासणीनंतर स्पष्ट होणार होते. दरम्यान ही गाडी वाडीव-हे याठिकाणी मिळाली होती आणि मिसींग तक्रार अंबड पोलीस ठाण्यात दाखल झाल्याने वाडीव-हे आणि अंबड पोलिसांनी समांतर तपास सुरु केला. गाडीतील मृतदेह कोणाचा आहे हे फॉरेन्सिक तपास व डी.एन.ए. चाचणीनुसार समजेल. या संदर्भात कोणाला काही माहिती द्यायची असली तर ती द्यावी. संबंधितांचे गाव-नाव गुपित ठेवण्यात येईल असे पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांनी जनतेला आवाहन केले. सर्वप्रथम पोलिसांनी मिळालेल्या सांगाड्याची डी.एन.ए. चाचणी केली. ती डॉ. वाजे यांच्या घरातील लोकांशी जुळते का हे पहाण्यासाठी डॉ. सुवर्णा वाजे यांच्या वडीलांची डी.एन.ए. चाचणी घेण्यात आली.ती मॅच होते हे स्पष्ट झाल्यानंतर हा मृतदेह हा डॉ. सुवर्णा वाजे यांचाच असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान अंबड पोलीस आणि वाडीव-हे पोलीस तांत्रिक विश्लेषणासह वाजे कुटुंबाकडून माहिती संकलीत करत होते. डॉ. वाजे यांचे पती संदीप वाजे यांच्याकडेही पोलिसांनी चौकशी केली. तेव्हा त्यांची पत्नी ही नेहमीप्रमाणे मंगळवार दि. २५ जानेवारी रोजी मोरवाडी येथे असलेल्या श्री स्वामी समर्थ रुग्णालयात ड्युटीसाठी गेल्या. पण घरी येण्याची वेळ टळून गेली तरी त्या आल्या नाहीत. अखेर त्यांनी अंबड पोलीस ठाण्यात त्या बेपत्ता झाल्याची तक्रार दिली. त्यानंतर वाडीव-हे पोलीस ठाण्याच्या हद्दीत जळालेली कार सापडल्यानंतर त्या कारच्या चेसीज नंबरवरून ती कार डॉ. सुवर्णा वाजे यांचीच असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी सिडको ते वाडीव-हे येथील घटनास्थळापर्यतचे सीसीटीव्ही फुटेज मिळवले. तसेच वाजे पती-पत्नी यांच्या मोबाईलचेही कॉल डिटेल्स गोळा करण्यास सुरुवात झाली. पोलिसांनी डॉ. सुवर्णा वाजे यांच्या घरच्या लोकांकडे चौकशी केली. त्यांच्या कार्यालयातील सहकाऱ्यांकडेही चौकशी करण्यात आली. यावेळी पोलिसांना डॉ. सुवर्णा वाजे आणि त्यांचे पती संदीप वाजे यांच्या दरम्यान वाद होत असल्याची माहिती मिळाली. संदीप वाजे हे बांधकाम व्यावसायिक आहेत. संदीप वाजे हा छंदी-फंदी आहे. त्याला डान्सबारसह अनेक छंद आणि व्यसने आहेत. त्यावरून पती-पत्नीमध्ये नेहमी वाद होत असत अशी माहिती डॉ. सुवर्णा यांच्या माहेरच्या लोकांनी तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी दिली. याबाबत संदीप विरोधात पत्नी तसेच पत्नीच्या माहेरच्या लोकांनी पोलीस ठाण्यात तक्रारीही केल्या आहेत. पती छळ करत असल्याचे सुवर्णा यांनी नातेवाईकांना सांगितले होते. ही माहिती मिळाल्यावरुन पोलिसांना यामध्ये घातपाताचा दर्प येऊ लागला आणि संशयाची सुई संदीप वाजे याच्याकडे वळू लागली. पोलिसांनी संदीप वाजे याच्या हालचालीवर लक्ष केंद्रीत केले. दरम्यान पोलिसांना आणखी एक माहिती मिळाली ती म्हणजे संदीप वाजे याने मोबाईलवर ठेवलेल्या डीपीची. या डीपीची चर्चा परिसरात सुरू होती. माणसाची आर्थिक स्थिती कितीही चांगली असली तरीही जीवनाचा खरा आनंद घेण्यासाठी त्याची मनस्थिती असावी लागते या वाक्यासह त्याने पत्नीसमवेतचा आपला फोटो लावला होता. हे प्रकरण घडल्यानंतर हा डीपी सोशल मीडीयावर चांगलाच व्हायरल झाला होता. त्यामुळे पोलिसांच्या संशयाची सुई त्याच्यावर स्थिरावत होती. दरम्यान मिळालेला मृतदेह सुवर्णा वाजे यांचाच असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी संदीप वाजे याला संशयावरून ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर त्याने गुन्हा कबुल केला. पाच साथीदारांच्या मदतीने त्याने हे कृत्य केल्याचे सांगितले. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. तपासादरम्यान पोलिसांनी डॉ. वाजे याच्या कार्यालयापासून जेथे त्यांचे वाहन आढळले त्या ठिकाणापर्यतचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यांच्या मोबाईलचे लोकेशनही ट्रॅक करण्यात आले. तसेच गाडी जाळण्यासाठी वापरलेल्या ज्वलनशील पदार्थाचेही विश्लेषण करण्यात आले. डॉ.सुवर्णा वाजे यांचा आधी कुठेतरी खून केला गेला असल्याचा संशय आहे.

## दारूच्या पैशावरून दोघांमध्ये वाद ...

मृतदेह पाहून सुरुपसिंग नाईक हादरले. पण हिंमत करुन त्यांनी मृतदेह न्याहाळला. त्यांना धक्काच बसला. कारण मृतदेहाच्या अंगावरचे कपडे त्यांच्या मुलाचेच होते. आपल्या मुलाचे कपडे म्हणजे हा मृतदेह आपल्या मुलाचा म्हणजे राजूचा तर नाही ना? अशी मनात आलेली शंका दूर करण्यासाठी त्यांनी पालथ्या अवस्थेतील तो मृतदेह सरळ केला. तर तो मृतदेह त्यांचा मुलगा राजू याचाच होता. मुलाचा मृतदेह पाहून सुरुपसिंग यांना घाम फुटला. क्षणभर ते नि:शब्द झाले. नेमके काय करावे हेच त्यांना सुचेना. शेवटी हिंमत करुन, आरडाओरडा करुन त्यांनी परिसरातील माणसे जमा केली. गावातील लोक घटनास्थळी धावत आले. कुणीतरी ही खबर गावच्या पोलीस पाटीलांना दिली. त्यांनी घटनास्थळी येवून खात्री केली आणि याची खबर तळोदा पोलीस स्टेशनला दिली. ढेकाटी-वाल्हेरी शिवारातील एका शेताच्या बांधावर राजू सुरुपसिंग नाईक याचा खून झाल्याचे समजताच तळोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक केलसिंग पावरा यांनी फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. एव्हाना राजू नाईक याच्या मृतदेहाभोवती बघ्यांची तोबा गर्दी झाली होती. तळोदा पोलिसांनी मृतदेहाभोवतीची गर्दी पांगवून घटनास्थळ आणि मृतदेहाचा पंचनामा केला. मृतदेहाची ओळख पटल्याने पोलीस निरीक्षक केलसिंग पावरा यांनी मृतदेह पोस्टमार्टम रिपोर्टसाठी तळोदा ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयात रवाना केला. आपल्या वरीष्ठांना याप्रकरणी खबर दिली. जिल्हा पोलीस अधीक्षक पी.आर. पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक विजय पवार, अक्कलकुवाचे उपविभागीय पोलीस अधिकारी संभाजी सावंत, गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी घटनेविषयी ग्रामस्थांकडून तसेच राजू नाईक याच्या नातेवाईकांकडून माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आदिवासी समाजातील होतकरु तरुणाचा ज्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. ती अवस्था लक्षात घेता, कुणी अज्ञातांनी त्याची निघृण हत्या केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक पी.आर. पाटील यांनी उसंत न घेता या निघृण हत्येचा छडा लावण्याचा आणि गुन्हेगारांना गजाआड करण्याचा आदेश दिला. घटनास्थळ अतिशय दुर्गम भागातील होते. तेथे सीसीटीव्ही फुटेजची उपलब्धता नव्हती. या पार्श्वभूमीवर प्रकरणाचा छडा लावायचा आणि गुन्हेगारांना शोधून गजाआड करायचे म्हणजे दिव्य काम होते. पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील यांच्या आदेशाचे पालन करत तळोदा तालुका पोलिसांच्या मदतीने नंदुरबार स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर हे आपले सहकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, सहाय्यक उपनिरीक्षक अनिल गोसावी, पोलीस नाईक सुनिल पाडवी बापू बागुल, पोलीस अंमलदार अभिमन्यू गावित यांनी तपास कामाला आरंभ केला. सुदैवाने या घातपाताच्या घटनेतील मयताची ओळख पटल्याने शोध पथकाचे निम्मे काम सोपे झाले होते. शोधपथकाने तपासाचा सुरूवातीचा भाग म्हणून राजू नाईक याच्या नजीकच्या व लांबच्या नातेवाईकाचे, तो रहात असलेल्या परिसरातील लोकांचे, त्याच्याबरोबर काम करणाऱ्या सहकाऱ्यांचे आणि मित्रपरिवाराचे प्राथमिक जबाब नोंदवून घेतले. शिवाय घटनास्थळाभोवतीच्या पंधरा पाड्यावरही संपर्क साधत माहिती मिळवण्याचा प्रयत्न युद्धपातळीवरुन करण्यात आला. संबंधित सर्वाचे प्राथमिक जबाब नोंदवले गेल्यानंतर त्या सर्व जबाबाची एकत्रित पडताळणी करण्यात आली. जबाबातून तपासासाठी एखादा धागा मिळतो का? याचा बारकाईने विचार करता तपास पथकाच्या लक्षात आले की राजू सुरुपसिंग नाईक याचा जवळचा मित्र उद्या उर्फ उदेसिंग कुशा पावरा याचा जबाब नोंदवला गेला नव्हता. हे लक्षात येताच उणीव रहायला नको म्हणून उदेसिंग पावरा याचा जबाब घेण्याचे ठरवले तेंव्हाच पोलिसांना राजू नाईकच्या खुनाची दिशा गवसली. त्याचा जबाब घेण्यासाठी पोलीस गेले असता तो ढेकाटी-वाल्हेरी गावातील एका झोपडीत दडून बसल्याची खबर मिळाली. तो लपून बसणे संशयास्पद असल्याने पोलिसांनी त्या झोपडीला घेराव घालून त्याला ताब्यात घेतले. तीस वर्षीय उदेसिंग पावरा याच्याकडे चौकशी करता अगदी साळसूदपणे आपण त्या गावचे नाही. आपला त्या घटनेशी सुतराम संबंध नसल्याचे त्याने सांगितले. जीवलग मित्रांचा खून झाल्यानंतरही तो लपून का बसला. याचे उत्तर काही तो देत नव्हता. त्यामुळे पोलिसांचा त्याच्यावरचा संशय बळावला. वरीष्ठांच्या सुचनेनुसार रविंद्र कळमकर यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाने उदेसिंग पावरा याचा पूर्वइतिहास तपासला. तेंव्हा २०१५ साली एका घरफोडीच्या गुन्ह्यात त्याला अटक झाली होती. त्याला नऊ महिन्याचा कारावासही झाला होता. उदेसिंग याची गुन्हेगारी प्रवृत्ती लक्षात घेताच कळमकर यांनी त्याच्यावर प्रश्नांची सरबत्ती करताच त्याचे उसने अवसान गळून पडले आणि त्याने राजू सुरूपसिंग याचा खून केल्याचे कबुल केले. उदोसिंग आणि राजू हे दोघे जवळचे मित्र होते. शनिवार दि. २२ जानेवारी २०२२ रोजी दुपारी एक ते दीड वाजण्याच्या दरम्यान दोघे मित्र दारु पिण्यासाठी घटनास्थळाजवळ एकत्र आले होते. थट्टा-मस्करी करत दारुचे पैसे देण्यावरुन दोघांमध्ये वाद निर्माण झाला. या वादाचे रुपांतर हाणामारीत झाले. त्यावेळी राजूने उदेसिंगला आईवरुन शिवीगाळ केली. त्याचा उदेसिंगला राग आल्याने संतापात त्याने भला मोठा दगड राजू नाईकच्या मस्तकात हाणला. त्याचा आघात होवून रक्तबंबाळ अवस्थेत राजू जमिनीवर कोसळला. अतिरक्तस्त्राव झाल्याने राजूची प्राणज्योत मालवली. आपला मित्र राजू नाईक याचा आपल्या हातून खून झाल्याचे लक्षात येताच उदेसिंगने घटनास्थळावरुन पळ काढला व तो ढेकाटी-वाल्हेरी शिवारातील एका उंच टेकडीवरील झोपडीत लपून बसला. कोणताही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पुरावा नसतांनाही हा तपास यशस्वी झाल्याने पोलीस अधीक्षक पी.आर. पाटील यांनी तपास पथकाचे अभिनंदन करत २५ हजाराचे बक्षिस जाहीर केले. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या तपास पथकाने गुन्हाची उकल होताच आरोपी उदेसिंग कुशा वसावे याला तळोदा तालुका पोलिसांच्या ताब्यात दिले. राजू नाईक याचे वडील सुरुपसिंग भोंग्या नाईक यांनी उदेसिंग वसावे याच्याविरोधात खुनाची फिर्याद दिली. त्याआधारे तळोदा पोलिसांनी उदेसिंग कुशा वसावे याच्याविरोधात भा.दं. वि. ३०२ नुसार गुन्हा दाखल करून त्याला गजाआड केले.

# भिवंडी पालिकेतील मूकबधीर सफाई कामगाराला जबर मारहाण, कामगारांचा तीव्र आंदोलनाचा इशारा





**भिवंडी/आकाश गायकवाड**

अमरावती पालिका आयुक्त प्रविण आष्टीकर यांना मारहाण झाल्याचे प्रकरण ताजे असतानाच भिवंडी पालिका क्षेत्रात स्वच्छता करणाऱ्या मूकबधिर दिव्यांग सफाई कामगारास ठोशाने बेदम मारहाण केल्याची घटना घडली असून शांतीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास उशीर केल्याने कामगार कर्मचारी अधिकारी यांनी पालिका मुख्यालया बाहेर येऊन निदर्शने करीत आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून अटक न केल्यास सोमवार पासून काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. किशोर बळीराम पाटील असे मारहाण झालेल्या मूकबधिर सफाई कामगारांचे नाव आहे. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील शांतीनगर परिसरातील गुलजार नगर या परिसरात किशोर पाटील हा मूकबधिर सफाई कामगार झाडू मारण्याचे काम करीत असताना त्या ठिकाणाहून जाणारा युनूस खान यांच्या अंगावर कचरा उडत असताना त्याने थांबण्यास सांगितले असता मूकबधिर असल्याने ते न समजल्याने किशोर पाटील हा कामगार आपले झाडू मारण्याचे काम करीतच राहिल्याने चिडून जवजन युनूस खान याने सफाई कामागारस ठोशा बुक्याने बेदम मारहाण केली. या मारहाणीने किशोर जखमी झाला असून त्यावर आयजीएम उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून या बाबत पालिका कामगार संघटना प्रतिनिधी व स्थानिक प्रभाग समिती क्रमांक एक मधील अधिकारी यांनी शांतीनगर पोलीस ठाण्यात तक्रार देण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी तक्रार दाखल कातून घेण्यास टाळाटाळ केल्याने दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास कामगार अधिकारी या सर्वांनी मुख्यालय प्रवेशद्वारावर एकत्रित होत या हल्याच्या निषेध करीत सायंकाळ पर्यत आरोपीस अटक न केल्यास सोमवार पासून काम बंद आंदोलन पुकारण्यात येणार असल्याचे इशारा कामगार संघटना प्रतिनिधींनी दिला आहे. अमरावती येथील घटना ताजी असताना भिवंडीत सफाई कामगारांवर झालेला हल्ला हा निषेधार्थ असून उच्च अधिकारी, कर्मचारी अथवा चतुर्थ श्रेणी कामगार या सर्वांच्या रक्षणाची जबाबदारी पालिका प्रशासन म्हणून आम्ही नक्कीच घेऊन यामध्ये दुजाभाव न करता मारहाण करणाऱ्या आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल असा विश्वास आयुक्त सुधाकर देशमुख यांनी दिला आहे.

# भंगारांच्या गोदामांना भीषण आग; १७ गोदामे जळून खाक



**भिवंडी/अभिजित हिरे**

शहर व ग्रामीण भागातील गोदाम पट्ट्यात आगीचे सत्र सुरु असून आज पहाटेच्या सुमारास पुन्हा लाखोंचे भंगार साठवून ठेवलेल्या गोदामांना अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत आतापर्यत १७ गोदामे जळून खाक झाली आहे. भिवंडी शहरातील गायत्री नगर परिसरातील फातमा नगर भागात भंगारांची गोदामे आहेत. या गोदामांना आज पहाटे ५ वाजताच्या सुमारास अचानक लागली भीषण आग लागली होती. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशामक दलाच्या ३ गाड्यांसह पाण्याच्या टँकरने आग विझविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू केले होते. मात्र तोपर्यत आगीच्या भक्ष्यस्थानी तब्बल १७ भंगार गोदामे पडल्याने जळून खाक आहे. या गोदामात कापडाच्या चिंध्या, लोचन, प्लास्टिक पुठ्ठा मोठ्या प्रमाणावर साठविल्याने आग अधिकच भडकून लगतच्या इतरही गोदामांना त्याची झळ पोहचली आहे. मात्र आगीचे कारण अजून अस्पष्ट असून आगीच्या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, ४ तासांच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले असून या ठिकाणी सद्या कुलिंग काम सुरु असल्याचे अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले.

# वाड्यातील व्यापाऱ्यावर चाकू हल्ला

**वाडा/प्रतिनिधी**

वाड्यातील आगारआळी येथे आपल्या आईकडे आलेल्या व्यापाऱ्यांवर पहाटेच्या सुमारास अज्ञात इसमाने चाकू हला करून जबर जखमी केल्याची घटना घडली आहे. वाड्यातील व्यापारी व व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष आशिष मनोरे यांना पहाटेच्या सुमारास घराच्या दराची कडी वाजल्याने पाहण्यासाठी ते बाहेर आले असता अज्ञात व्यक्तीने अचानक त्यांच्यावर चाकूने हल्ला केला व काही समजण्याच्या आत तो मारेकरी फरार झाला. मनोरे यांच्या पोटात चाकू खुपसल्याने ते गंभीर जखमी झाले होते त्यांना तात्काळ ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटल येथे अधिक उपचारासाठी दाखल केले असता दुपार पर्यत त्यांचे ऑपरेशन यशस्वी होऊन त्यांची प्रकृती सुधारत असलयाची माहिती मिळाली आहे. दरम्यान वाडा पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून वाडा पोलीस आदिक तपास करत आहेत. सदरच्या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून आरोपींवर कडक कारवाई करण्याच्या यासाठी व्यापारी संघटनेने वाडा पोलिसांना निवेदन दिले आहे.

# सोलापूर शहरात वाहतूक नियमावर पुन्हा पंधरा दिवसाचे समुपदेशन

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहर वाहतूक शाखेतर्फे सर्व सोलापूर शहरातील शाळा कॉलेजेस मध्ये वाहतुकीच्या नियमांच्या संदर्भात जनजागृतीचा कार्यक्रम पुढील १५ दिवस राबविण्यात येणार असल्याची माहिती सोलापूर शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक आर्वे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. यामध्ये वाहतूक शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी प्रत्येक शाळा व कॉलेजमध्ये समक्ष जाऊन विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत आवाहन व मार्गदर्शन करणार आहेत. सोलापूर शहरातील विविध ऑफिसमध्ये जाऊन तेथे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन व आवाहन करण्यात येणार आहे. सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत सर्व नागरिकांना व महिलांना जाहीररीत्या आवाहन व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच पंधरा दिवसानंतर दररोज ठराविक वेळी सोलापूर शहरातील सर्व नागरिक त्या ठिकाणी थांबून वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याची शपथ घेण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.



कारवाई करू नका म्हणणारे एक ही नियम पाळा म्हणून सांगत नाहीत गेल्या काही दिवसापूर्वी सोलापूर शहर वाहतूक पोलिसांकडून नियम मोडणाऱ्या वाहनचालकांचे समुपदेशन करून कारवाईचा धडाका सुरू करण्यात आला होता. त्यावेळी अनेक राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांनी पोलिसांच्या कारवाईस विरोध केला होता. त्यामुळे पोलिसांना कारवाई मागे घ्यावी लागली होती. परंतु सोलापूर शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी वाहनचालकांनी नियम पाळून वाहने चालवावे असे एकाही राजकीय पक्षाने किंवा लोकप्रतिनिधींनी किंवा संघटनेने साधे आवाहन देखील केलेले नाही. त्यामुळे सोलापुरातील वाहतुकीला शिस्त तरी लागणार कधी असा प्रश्न उपस्थित होतो.

# काशिमिरा पोलिसांनी पडकला लाखोंचा गुटखा



**विरार/प्रतिनिधी**

गुन्हे प्रकटीकरण कक्षा-१ काशिमिरा या पोलीस पथकाला मिळालेल्या माहितीवरून काशिमिरा नाका, शेल पेट्रोल पंपाजवळ प्रणय सुर्वे (वय २७) आणि मेहबूब जमादार (वय ३४) दोघे रा. केतकीपाडा, दहिसर, मुंबई यांना शिताफीने ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून प्रवासी रिक्षा क्र. एमएच४७/एजे१३९६ मध्ये महाराष्ट्र राज्य शासनाने प्रतिबंधित केलेला १ लाख ९७ हजार ४८ रुपये किमतीचा गुटखा व रोख रक्कम १ लाख ६० हजार रुपये हस्तगत करण्यात आले. त्यांच्याकडे अधिक तपास केला असता मेहबूब जमादार याने त्याचा साथीदार एहसान शेख याच्याशी संगनमत करून एहसान शेख याने भाडेतत्त्वावर घेतलेल्या खोलीमध्ये एकूण ११ लाख ३८ हजार १६८ रुपये किमतीचा गुटख्याचा साठा केला असल्याचे सांगितले. असा एकूण १३ लाख ३५ हजार २१६ रुपये किमतीचा गुटखा जवळ बाळगल्या प्रकरणी त्यांच्या विरोधात काशिमिरा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा रजि. नं. ७५/२०२२ भादविसं कलम ३२८, १८८, २७३, ३४ सह अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ चे कलम २६ (२), (४) ३०(२), (ए) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहा.पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.निरीक्षक अविराज कुराडे, पो.उपनिरीक्षक हितेंद्र विचारे, पो.उपनिरीक्षक पुष्पराज सुर्वे, सहा.पो.उपनिरी. महादेव वेदपाठक, सहा.पो.उपनिरी. राजू तांबे, पोहवा. संदीप शिंदे, पोहवा. किशोर वाडीले, पोहवा. अविनाश गर्जे, पोना. संतोष लांडगे, पोना. पुष्पेंद्र थापा, पोना. सचिन सावंत, पोशि. प्रशांत विसपुते यांनी कामगिरी पार पडली आहे.

# सोलापूर शहरातील अवैध धंदे बंद करण्याची मागणी



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहरात सुरू असलेले मटका, गुटखा, मावा, हातभट्टी दारू असे अनेक अवैध धंदे बंद करून संबंधितावर कारवाई करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने पोलीस आयुक्त व जिल्हाधिकारी यांना देण्यात आला आहे. सोलापूर शहरात मटका, गुटका, जुगार, हातभट्टी दारू व चोरून विकली जाणारी विदेशी दारू रिक्षा कारमध्ये घरगुती गॅसचा वापर करून अवैधपणे गॅस भरणे अवैद्य विकली जाणारी फ्रूट बीअर, ताडी, शिंदी तसेच ऑर्केस्ट्रा बारच्या नावाने चालणारे डान्सबार व खाजगी वेश्याव्यवसाय असे अवैद्य धंदे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत ते बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष संतोष केंगनाळकर, राजकुमार सारणे, कार्याध्यक्ष आनंद बुक्कानुरे, नागप्पा कोप्पा, प्रदीप मडिवाळ यांची नावे व सह्या या आहेत. दरम्यान अवैध धंदे बंद करण्याबाबत डीसीपी डॉ.दिपाली ताटे यांनी २० जानेवारी २०२२ रोजी आदेश काढले होते, त्याचे शहरातील सात ही पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांना आदेश दिले होते. मात्र सातही ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे बंद करण्यात आले नाहीत.

# १४ फेब्रुवारीला कोकण विभागीय लोकशाही दिन

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार दि.१४ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयातकोरोना प्रतिबंधक सर्व नियमांचे पालन करुन आयोजित करण्यात आला आहे. या दिवशी विभागीय आयुक्त व विभागीय स्तरावरील शासकीय अधिकारी सकाळी १०.०० ते दु.१.०० पर्यत जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी, अडचणींबाबत अर्ज, निवेदने स्विकारणार आहेत. लोकशाही दिनाच्या बैठकीत ज्या अर्जदारांनी १५ दिवस अगोदर या कार्यालयाकडे विहित नमुन्यामध्ये अर्ज सादर केलेला असेल अशाच अर्जदारांचे गा-हाणे ऐकण्यात येईल. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, राजस्व, अपील्स, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहित मुदतीमध्ये सादर न केलेले अर्ज, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे व देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भातील केलेले अर्ज आणि तक्रारींचे निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत. सदर दिवशी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जावर प्रथम चौकशी करण्यात येणार असून त्यानंतर लोकशाही दिनातील प्रलंबीत अर्जावर टोकन क्रमांकानुसार आढावा घेण्यात येणार आहे. याची कृपया नोंद घ्यावी. असे उपायुक्त, (सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# धनादेश प्रकरणी अरोपीस सहा महिन्याची शिक्षा

## धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट रक्कम देण्याचे देवणी न्यायालयाचा निकाल

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील प्रथम न्यायदंड अधिकारी नुकतेच धनादेशातील प्रकरणात अरोपीस धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट रक्कम देण्याचे आदेश केले व कलम १३८ एन आय अक्ट प्रमाणे सहा महिण्याची शिक्षा अरोपीस ठोठावली.

याबाबत ॲड. एस.के.मळभगे यांच्या कडुन मिळालेली माहिती अशी कि, देवणी येथील अनिल शिवाजी कारभारी यांनी, अरोपी कंटेप्पा मल्लीकार्जुन पाटील राहणार सोनाळवाडी ता.कमालनगर (कर्नाटक) यास हात उसने रक्कम रुपये ८०,००० हजार रुपये एक महिण्याच्या आत परत करण्याच्या अटीवरती अरोपीस दिले होते, माञ एक महिण्याचे मुदत संपुन हि अरोपीने फिर्यादीस सदर रक्कम परत केले नाही. अरोपीने पिर्यादीची रक्कम देण्यास टाळाटाळ केले व शेवटी अरोपीने फिर्यादीच्या नावे अरोपीचे खाते असलेले स्टेट बँक आफ हैद्राबाद शाखा कमालनगरचे धनादेश फिर्यादीस दिले. फिर्यादीने फिर्यादीच्या खाते असलेले भारतीय स्टेट बँक शाखा देवणी येथे धनादेश वटविण्यासाठी सादर केले असता अरोपीच्या खात्यात रक्कम नसल्या कारणाने अपुरे रकमे अभावि सदर धनादेश न वटता परत आले. त्यानंतर फिर्यादीने अरोपीस नोटीसी पाठवुन हि अरोपीनी फिर्यादीस रक्कम परत केले नाही व नोटीसीचे उत्तर हि दिले नाही. त्यामुळे फिर्यादीने ॲड.एस.के. मळभगे यांच्या मार्फत देवणी न्यायालयामध्ये कलम १३८ एन आय ॲक्ट प्रमाणे फिर्याद दाखल केली. एकंदरीत



ॲड. एस.के.मळभगे

साक्षी पुराव्यावरुन देवणी न्यायालयाचे न्यायमुर्ती यु.पी.कपाळगर यांनी सहा महिण्याची शिक्षा ठोठावली व धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट रक्कम १६०००० (एक लक्ष साठ हजार रुपये) फिर्यादीस देण्याचे आदेश केले आहे,फिर्यादिच्या बाजुने ॲड.एस.के.मळभगे देवणी यांनी बाजु मांडली. दरम्यान सन २०१७ मध्ये अड एस के मळभगे यांनी देवणी येथील ४ पोलिसांनी टाकळी येथील एका शेतकऱ्यास बेदम मारहाण प्रकरणी त्या चार पोलीसांना एका वर्षाची सक्त करावस व १००००/प्रत्येकी दांडाची रक्क्म सुनावली होती. या प्रकरणी पण फिर्यादीचे विधिज्ञ अड एस के मळभगे हेच वकील होते.

# थोडक्यात वृत्तांत

### देवणी येथे बेवारस मोटार सायकलचा लिलाव

देवणी : लातूर देवणी पोलीस ठाणे येथे बेवारस असलेल्या एकूण ५० मोटार सायकलींचा लिलाव गुरुवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ठिक १०.०० दहा वाजता करण्याचे आयोजन केले आहे तरी ईच्छुकांनी पोलीस ठाणे देवणी येथे २००/- रुपयेच्या बाँडसह उपस्थित रहावे, असे अव्हाण पोलीस निरीक्षक गणेश सोडारे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. पोलीस ठाणे, देवणी येथे बेवारस असलेल्या मोटारसायकलचा लिलाव करण्यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी व तालुका दंडाधिकारी देवणी यांच्याकडून परवानगी घेण्यात आलेली आहे असे ही प्रसिध्दी पत्रकात नमुद केले आहे.

### २१ फेब्रुवारीपासून राज्य नाट्य स्पर्धा सुरु होणार

मुंबई : राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित करण्यात येणारी राज्य नाट्य स्पर्धा २१ फेब्रुवारी २०२२ पासून राज्यातील १९ केंद्रांवर घेण्यात येईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी केली. ओमायक्रॉन आणि कोवीड-१९ विषाणू संसर्गाच्या वाढत्या पार्श्र्वभूमीवर, जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात होणारी राज्य नाट्य स्पर्धा स्थगित करण्यात आली होती. हौशी मराठी नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी २१ फेब्रुवारी पासून, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धा ५ मार्च पासून तर बालनाट्य स्पर्धा १० मार्च आयोजित करण्यात येणार आहे, असेही देशमुख यांनी सांगितले. सर्व सहभागी संघांनी कोवीड-१९ विषाणू प्रादूर्भाव संदर्भात शासनाने वेळोवळी निर्गमित केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करुन स्पर्धेतील प्रयोगाचे सादरीकरण करावे असे सांगून सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी सर्व सहभागी संस्थांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### डहाणू येथील उपकोषागार कार्यालयाचे स्थलांतर

पालघर : डहाणू येथिल उपकोषागार कार्यालय डहाणू, तहसिलदार कार्यालय, आवार, डहाणू फोर्ट येथे कार्यरत होते. सदरील कार्यालय नविन जागी प्लॉट नं. १०१, गाळा नं. १ व २, हवाबाई अपार्टमेंट, शोभा हॉटेल जवळ, आझाद लेन, डहाणू गाव, ता. डहाणू येथे स्थलांतरीत करण्यास मान्यता मिळाली आहे.

### जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर!

पालघर : ज्या अर्जदारांनी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पालघरकडे दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पुर्वी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केले आहेत. त्या सर्व अर्जदारांनी २८ फेब्रुवारी, २०२२ पर्यत मूळ अर्ज व अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे (साक्षांकित प्रत) पालघर समिती कार्यालयाकडे सादर करणेत यावे, असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच, ज्या अर्जदारांनी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पालघरकडे दिनांक ३१ डिसेंबर २०२१ पुर्वी अर्ज सादर केले आहेत आणि जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पालघरने अशा अर्जदारांना त्यांच्या अर्जातील त्रुटींबाबत पत्रान्वये यापूर्वीच अवगत केले आहे. अशा अर्जदारांनी त्यांच्या अर्जातील त्रुटी पुर्ततेकामी अधिकचे पुरावे, कागदपत्रे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ पर्यत पालघर समिती कार्यालयाकडे सादर करणेत यावे, असे आवाहन उपायुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य विशाल नाईक यांनी केले. अर्जदारांकडून वरील कालावधीत त्रुटी पुर्तता न झाल्यास त्यांची प्रकरणे बंद करण्यात येतील व त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक असल्यास नव्याने अर्ज सादर करावा लागेल याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

### नेहरू युवा मंडळाला युवा पुरस्कारासाठी अर्ज

लातूर : केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय भारत सरकार अंतर्गत कार्यरत नेहरु युवा केंद्र लातूर मार्फत शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, स्वयंरोजगार पर्यावरण विकास, युवक विकास व राष्ट्रीय एकात्मता आदी क्षेत्रात वर्ष २०२०-२१ मध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नेहरु युवा मंडळाला विशेष युवा मंडळ पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात येते. या पुरस्कारासाठी दिनांक २१ फेब्रुवारी २०२२ पुर्वी अर्ज नेहरु युवा केंद्र लातूर मध्यवर्ती प्रशासकीय इमारत लातूर येथे दाखल करावेत, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी साक्षी समैया यांनी केले आहे. जिल्हास्तरावर पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या मंडळाला २५ हजार रुपये, राज्यपातळीवर पात्र ठरलेल्या मंडळाला रु. ७५ हजार, राष्ट्रीय पातळीवर पात्र ठरलेल्या मंडळाला प्रथम रु. ३ लाख, व्दितीय रु. १ लाख व तृतिय रु. ५० हजार पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. अधिक माहितीसाठी ०२३८२- २९५५९८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### पोलीस स्टेशन रेणापूर बेवारस वाहनाचा लिलाव

लातूर : पोलीस स्टेशन, रेणापूर येथे एकुण ४९ बेवारस वाहनांचा जाहीर लिलाव मंगळवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पोलीस स्टेशन रेणापूर आवारात करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक सोपान शिरसाट पोलीस स्टेशन रेणापूर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. पोलीस स्टेशन रेणापूर येथील ४९ बेवारस वाहनामध्ये दुचाकी, तीन चाकी व चार चाकी वाहनाचा समावेश आहे. वाहनाचा लिलाव करण्यासाठी नमुद वाहनाचे मालकी हक्क सिध्द करण्यासाठी आज पावेतो कागदोपत्री पत्रव्यवहार करुन कोणीही मालकी हक्क सिध्द करु न शकल्याने नमुद वाहनाचे किंमती (मुल्यांकन) बाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी लातूर यांना पत्रव्यवहार करुन त्यांचेकडून बेवारस वाहनाचे मुल्यांकन करुन किंमतीची लेखी माहिती प्राप्त झाली असून लिलावाची परवानगी घेण्यात आली आहे असे ही प्रसिध्दी पत्रकात नमुद केले आहे.

### देवणी येथे बेवारस मोटार सायकलचा लिलाव

लातूर : जिल्ह्यातील पोलीस ठाणे, देवणी येथे बेवारस असलेल्या एकूण ५० मोटार सायकलींचा लिलाव गुरुवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्याचे आयोजन केले आहे. तरी ईच्छुकांनी पोलीस ठाणे, देवणी येथे २००/- रुपयेच्या बाँडसह उपस्थित रहावे, असे पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, देवणी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.पोलीस ठाणे, देवणी येथे बेवारस असलेल्या मोटारसायकलचा लिलाव करण्यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी व तालुका दंडाधिकारी देवणी यांच्याकडून परवानगी घेण्यात आलेली आहे असे ही प्रसिध्दी पत्रकात नमुद केले आहे.

# अन्यथा देशाची दुसरी फाळणी!

केंद्रात जेंव्हा पासून भाजपा सरकार सत्तेमध्ये आले तेंव्हापासून जाती धर्माचे वाद वाढू लागलेत आणि दलीत, आदिवासी, ख्रिश्चन आणि मुस्लिम यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खास करून मुस्लिमांच्या बाबतीत भाजप सरकारची भूमिका काहीशी अन्यायकारक आह आणि त्यातून त्यांच्यात असुरक्षतेची भावना निर्माण झाली आहे. कारण कधी मुस्लिमांना गोहत्येवरून, कधी रस्त्यावरच्या नमाजावरून तर कधी अजानावरून टार्गेट केले जात आहे आणि आता हिजाब वरून वाद सुरू झालाय आणि या वादाचे देशभर तीव्र पडसाद उमटत आहेत जे देशाला दुसऱ्या फाळणीच्या दिशेने नेत आहेत. या देशाची धर्माच्या आधारे फाळणी झालेली आहे आणि फाळणीच्या वेळेस हिंदू-मुस्लिम दंगलीत किती लोक मेले याचा हिशोब नाही. कारण धर्म ही तेंव्हाही अफूची गोळी होती आणि आताही आहे धर्माचं वेढ डोक्यात शिरलं की मग माणसाचा फालतू धार्मिक अभिमान जागा होतो आणि त्याला व्होट बँकेचं राजकारण बनवून पुढारी लोक आपली पोळी भाजून घेतात. लोकांना हे सगळ दिसत असताना समजत असताना पुन्हा पुन्हा जात धर्म यावरून का देशात तणाव निर्माण केला जातो तेच काळात नाही. सध्या मुस्लिम विद्यार्थिनींच्या हिजब वरून देशातील वातावरण तापलं आहे आणि पाच राज्यांच्या निवडणुकीच्या प्रचारात जो हीजाब पेट्रोल ओतण्याचे काम करीत आहे. कर्नाटकातील उडीपी येथील एका कॉलेजात हिजाब घालून आलेल्या मुलींना रोखण्यात आले. त्यामुळे त्या मुलींनी कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. इथपर्यंत सगळ ठीक आहे. पण मुस्लिम मुलींच्या हिजाब विरुद्ध हिंदू मुलांनी गळ्यात भगवे पट्टे घालून शाळेत येण्याचा जो निर्णय घेतला आहे तो चिंताजनक आहे. कारण हा वाद पेटल्यानंतर हिंदू तरुण जय श्रीरामच्या घोषणा देत होते, तर मुस्लिम तरुणी अल्ला हो अकबरचे नारे देत होती. त्यामुळे अशा परस्पर विरोधी नारेबाजीमुळे हिंदू-मुस्लिम दंगली घडू शकतात. त्यामुळे हे सगळ आता कायद्याने नाही तर पोलिसी बळावर थांबवण्याची वेळ आलेली आहे. लोकांना हे कसं कळत नाही की शैक्षिणक जीवन हा आयुष्याचा एक महत्वाचा टप्पा आहे. निदान तिथे तरी धार्मिक तणाव निर्माण व्हायला नको. कारण शाळा-कॉलेजातील विद्यार्थी-विद्यार्थिनी हे भारताचे भविष्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना धार्मिक वेडापासून दूर ठेवायला हवं. अन्यथा त्याचे देशाला गंभीर परिणाम भोगावे लागतील. कारण कर्नाटकातील हिजाब प्रकरणाचे आता देशभर पडसाद उमटू लागलेत. मुंबईत मुस्लिम महिलांनी सह्यांची मोहीम सुरू केली आहे, तर बीड आणि मालेगावमध्ये मुस्लिम महिलांनी राष्ट्रवादीच्या सोबत मोर्चे काढले. देशाच्या इतर भागात सुद्धा वातावरण तणावपूर्ण आहे. पण पंतप्रधान मोदी आणि इतर नेत्यांना पाच राज्यातील निवडणूक प्रचाराची पडली आहे. देश खड्ड्यात गेला तरी चालेल. जातीय दंगलीत लोक मेले तरी चालतील, पण पाच राज्यात भाजपाला सत्ता स्थापन करायची आहे. त्यामुळे हिजाब प्रकरणाचा प्रत्येक पक्ष आपल्याला कसा फायदा होईल याच्या विचारात आहे. किती भयंकर आहे हा सगळा प्रकार! जर हे थांबले नाही तर हिंदू मुस्लिम तरुण तरुणी रस्त्यावर उतरून एकमेकांची डोकी फोडतील. देशात रक्ताचे पाट वाहतील. कारण जेंव्हा कुठल्याही आंदोलनाची सूत्रे तरुणांकडे जातात ते आंदोलन हिंसक बनते आणि दोन समाजातील दरी आणि तणाव वाढवण्यास कारणीभूत ठरते. कर्नाटकातील भाजपा सरकारला आताच ड्रेस कोडची आठवण कशी काय झाली? कारण यापूर्वी जेंव्हा मुस्लिम मुली हिजाब घालून येत होत्या तेंव्हा त्यांना कुठे विरोध झाला नाही. मग आताच ही खाजवून खपली का काढली जातेय आणि केंद्र सरकार गप्प का? हेच जर महाराष्ट्रासारख्या विरोधी पक्षाच्या राज्यात घडले असते, तर भाजपवाल्यांनी थयथयाट केला असता. मग आता शेटजी आणि भटजी गप्प का? याचे उत्तर त्यांनी द्यायला हवे. या देशात एक असाही वर्ग आहे जो जात धर्म मनात नाही आणि असे लोक हिंदू व मुस्लिम दोन्ही समाजात आहेत, आता त्यांनीच या प्रश्नावर उठाव करून दोन्ही धर्मातील कट्टर पंथीयांच्या विरोधात आवाज उठवायला हवा!

# आभासी जगतातील खलनायक!

**टाळेबंदी नंतर ऑनलाईन असणं हा जीवनाचा अविभाज्य भाग बनू लागला. अगदी लहान मुलांच्या हातातही मोबाईल, लॅपटॉप आला आणि ते अमार्यादीत वायफायच्या माध्यमातून आभासी जगताशी जोडले गेले. मात्र या आभासी जगतात रमताना अनेक धोके थेट घरात शिरले. विविध समाजमाध्यमांच्याद्वारे आकर्षण, प्रेम, भूलथापा, आश्वासने देऊन फसवणुकीचे प्रकार वाढले आणि वयात येणाऱ्या किशोरवयीनमुली त्याला बळी पडू लागल्या. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तांनी नुकत्याच प्रसिध्द केलेल्या अहवालात विनयभंग, बलात्कार तसेच लैंगिक छळवणूकीचे प्रकारांचा उगम हा ऑनलाईनच्या आभासी जगातून होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.**

### दिशायन



महिलांवरील अत्याचार हा संवेदनशील विषय आहे. त्यात वाढ होणे हे देखील नवीन नाही. मात्र आता या अत्याचाराचे उगम ऑलनाईनच्या आभासी विश्वातून होत असल्याचे समोर आले असल्याने चिंता वाढली आहे. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाने नुकताच २०२१ च्या गुन्हेगारीचा आलेख असलेला अहवाल प्रसिध्द केला आहे. या अहवालात महिलांवरील लैंगिक अत्याचारात कमालीची वाढ झाली असल्याचे दिसून आले आहे. आकड्यांच्या भाषेत सांगायचे झाले तर २०२१ या वर्षात २९२ बलात्कार, ५०२ अपहरण, ४१४ विनयभंग आणि बाल लैंगिक अत्याचाराच्या अर्थात पोक्सो अंतर्गत २७२ गुन्हे दाखल झाले आहेत. मुलींवर अशाप्रकारे लैंगिक अत्याचार करणारे कोण आहेत पाहिल्यानंतर जे समोर आलं ते धक्कादायक होतं. लैंगिक छळाच्या बहुतांश प्रकरणातील आरोपी हे आंतरजालाच्या आभासी विश्वातून विविध समाज माध्यमद्वारे आलेले असतात. त्यामुळे या समाजमाध्यमाद्वारे होणारी फसवणूक हा एक ज्वलंत सामाजिक प्रश्न बनत चालला आहे.

गेल्या काही वर्षापासून दैनंदिन वापरात आंतरजालाचा वापर वाढला. त्यात विविध समाजमाध्यमे आली. करोनाच्या काळात तर शिक्षणापासून कामापर्यंत ऑनलाईन वापराशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे अजाणत्यावयात मुला मुलींच्या हातात मोबाईल, टॅब आणि लॅपटॉप नामक उपकरणे आली. त्याद्वारे अल्पवयीन मुली आभासी जगतात रमू लागल्या आणि त्यामुळेच आभासी जगतातील खलनायक' घराच्या उंबरठण्यावर येऊ लागले. कोण आहेत हे खलनायक? तर आभासी जगातून विविध माध्यमातून विविध रुपातून ते मुलींना जाळ्यात ओढणारे विकृत आहेत. कधी फेसबुक, इन्स्टाग्रामवर बनवाट आयडी (ओळख) तयार करून अल्पवयीन मुलींशी संपर्क करायचा, कधी मैत्रीचे, कधी प्रेमाचे नाटक करून तर कधी नोकरीचे, मॉडेलिंगचे ऑफर देऊन जाळ्यात ओढायचे. त्यानंतर मग अश्लील चॅट करण्यास भाग पाडायचे त्या चित्रफिती आणि छायाचित्रांच्या आधारे मग ब्लॅकमेल करून खंडणी उकळायची असे प्रकार (सेक्टॉर्शन) वाढले आहे. आता प्रत्यक्षात रस्त्यात गाठून विनयभंग न करता ऑनलाईनच्या माध्यमातून विनयभंग करण्याचे प्रकार वाढले आहेत. पोलिसांकडे केल्या जाणाऱ्या तक्रारींचे प्रमाण १ टक्का पण नाही. बदनामीपोटी भीतीपोटी अनेक मुली तक्रारीच देत नसल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. त्यामुळे या आभासी जगातामुळे मुलांपुढे किती मोठे धोके निर्माण केले आहेत, या भीषणतेची कल्पना यावी.

**वायफायच्या घरात मुली असुरक्षित!**

पुर्वी सातच्या आत मुली घरात आल्या की सुरक्षित मानल्या जात होत्या. त्यावेळी आंतरजाल (इंटरनेट), सोशल मिडिया नव्हता. फारतर फोन असायचा. त्यामुळे मुलगी घरात एकटी असली तर बाहेर गेलेले पालक निश्चिंत असायचे. आता तशी परिस्थिती राहिलेली नाही.मुलांना स्वातंत्र्य, खासगीपण देण्याच्या नावाखाली तसेच कामानिमित्त पालक दिवसभर बाहेर असतात. मुलांकडे मोबाईल असतो आणि वायफाय मुळे ते आभासी जगाशी जोडले जातात. पालक बाहेर असले आणि घरात वायफाय असल्यावर मुली एकटे असणे चिंताजनक आहे. आता घरात वायफाय असलेली मुलगी सुरक्षित नाही अशी वेळ आली आहे. कारण ती आंतरजालाच्या माध्यमातून अनोळखी आभासी जगात जोडली जाते आणि किशोरवयीन मुलं मुली स्वप्नाळू असतात. त्यांना आकर्षण असते. आपल्या आयुष्यात एखादा नायक असावा अशा स्वप्नरंजनात ते असतात. मात्र बाहेरच्या जगातील अपप्रवृत्तीबद्दल ही मुले अजाण असतात आणि प्रलोभनाला बळी पडत असतात. त्यामुळे आभासी जगातून नायकाऐवजी विविध खलनायक तिच्या आयुष्यात येतात. मैत्री, प्रेमाच्या नावाखाली या मुलींचे आर्थिक आणि लैंगिक शोषण करत असतात.. मुलींचे आयुष्य उध्वस्त करणारे हे आभासी जगातील हे खलनायक कधी मित्र बनून, कधी प्रियकर बनून कधी कुठलेतरी आमिष दाखवून आलेले असतात. त्यामुळे सावध राहण्याची गरज आहे.

**मुली का पळून जातात?**

अल्पवयीन मुली घरातून पळून जाण्याच्या घटना वाढल्या आहेत आणि तो एक सामाजिक प्रश्न बनला आहे. २०२१ मध्ये शहरातून एकूण ५२२ अल्पवयीन मुले मुली बेपत्ता झाली होती. त्यात ४२० मुली आणि १०२ मुलांचा समावेश होता. यापैकी ९२ मुले आणि ३५१ मुली यांचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले आहे. मात्र अद्यापही ७५ बेपत्ता मुलामुलींचा शोध लागलेला नाही. या मध्ये ९० टक्के मुली या प्रेमप्रकरणातून पळून जात असल्याचे समोर आले आहे. या मुली घरात असतात मग कोण त्यांना फूस लावतं? त्या पळून का जातात? याचे उत्तर शोधले तर या आभासी जगात आहे. फेसबुक, इन्स्टाग्रामवर भेटलेल्या अनोळखी लोकांच्या प्रेमात पडून मुली त्यांना भुलतात आणि मग घरातून पळून जात आहेत. समोरचा व्यक्ती कोण आहे, तो खरा आहे की खोटा याची कल्पना नसते. मात्र आभासी जगात मुली वरवर दिसणाऱ्या नकली विश्वावा भूलतात आणि फसतात. मिरा भाईंदर वसई विरार शहरातील पोलीस ठाण्यांमध्ये दररोज ३ ते ४ अल्पवयीन मुलेमुली घर सोडून पळून जात असतात. आभासी जगातून जेव्हा वास्तवाची जाणीव होते तेव्हा या खलनायकांचा बुरखा फाटलेला असतो, मात्र वेळ हातातून निघून गेलेली असते. बलात्काराची वाढती प्रकरणे देखील चिंतेची बाब बनत चालली आहे. समाजमाध्यमाद्वारे अवघ्या काही दिवसांची, महिन्यांची ओळख होते आणि मग थेट भूलथापा देऊन शरीरसंबंधास भाग पाडले जाते. कधी फसवून, कधी ब्लॅकमेल करून मग कधी खोटी आश्वासने देऊन. प्रेमसंबंधातील नाजूक क्षणांचे छायाचित्र आणि चित्रफिती तयार करून मगत्याआधारे पुन्हा ब्लॅकमेलींग केले जात आहे. पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे अहवालात अशा घटना मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. २०२१ या वर्षात बलात्काराच्या २९२ घटना घडल्या आहेत. यातील पीडित महिलांच्या परिचयाच्या लोकांचा समावेश जास्त आहे. म्हणजे २९२ बलात्काराच्या प्रकरणामध्ये केवळ ३ प्रकरणात आरोपी अनोळखी आहेत. म्हणजे इतर सर्व आरोपी ओळखीचे आहेत. आकडेवारीनुसार बलात्काराच्या ३९२ प्रकरणात ओळखीचे १००, मित्र १२३, शेजारी २३, कुटुंबिय ८२ असे प्रमाण आहे. व्यस्त पालक, विभक्त कुटुंबपध्दती यामुळे मुलांशी होणारा संवाद खुंटला आहे. लहान मुलींना समाजमाध्यमाचे धोक्यांपासून सावध करण्याची वेळ आले आहे. आभासी जग आणि वास्तवाचे जग याची जाणीव करून देणे गरजेचे आहे. नाहीतर आभासी जगातील खलनायक तुमच्या घराचेही दाद ठोठावल्याशिवाय राहणार नाही.

## मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस मुख्यालयाचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध!

# पोलीस आयुक्त सदानंद दाते यांच्या विविध उपक्रमांमुळे पोलीस दलाची क्षमता आणि विश्वसनीयता वाढली!






पालघर जिल्ह्याच्या वसई, विरार, नालासोपारा येथील वाढती गुन्हेगारी आणि त्या तुलनेत पोलिसांचे अपुरे मनुष्यबळ लक्षात घेऊन मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस मुख्यायलयाची स्थापना करण्यात आली आणि धाडसी व कार्यक्षम पोलीस अधिकारी अशी ओळख असलेले सदानंद दाते यांच्याकडे या पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार सोपविण्यात आला. दाते साहेबांनी पोलीस आयुक्त म्हणून वर्षभरातच आपल्या कार्याची छाप पाडून जनता आणि पोलीस यांच्यात समन्वय आणि विश्वासाचे नाते निर्माण होण्यासाठी अनेक चांगले उपक्रम राबवले. पोलिसदल अधिक मजबूत आणि कार्यक्षम करण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबवल्या २०२१चा कार्य अहवालात या सगळ्या गोष्टींचा आढावा घेण्यात आलाय.

नव्या पोलीस आयुक्त कार्यालयाच्या कार्यकक्षेत ३ पोलीस उपायुक्त कार्यालये ४ सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय आणि दोन नवीन पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली. सन २०२१ मध्ये १०४९५ गुन्हे दाखल असून १२६३३ गुन्ह्यांची निर्गती करण्यात आली. तसेच ४०९०९ अर्जाची व ३०२१ मुद्देमालची निर्गती करण्यात आली. सर्वांत महत्वाचं मीरा-भाईंदर, वसई विरार पोलीस मुख्यालय हे ई- ऑफिस कार्यप्रणाली सुरू करणारे महाराष्ट्रातले पाहिले पोलीस मुख्यालय ठरले आहे. मनुष्यवधाचा तपास पथक, भरोसा सेल तसेच बालके व महिला शोध कक्षाची नव्याने स्थापन करण्यात आली. पोलीस आयुक्तालयाची माहिती नागरिकांपर्यंत पोहचावी तसेच नागरिकांच्या समस्या, पोलिसांचे नवीन उपक्रम गुन्हेगारी विषयक माहिती मिळावी यासाठी आपले स्वतंत्र संकेतस्थळ तयार केले.

२०२१च्या बारा महिन्यातील ठळक घटना आणि उपक्रम यांची माहिती या अहवालात आहे. जानेवारीत नशा मुक्ती अभियान, सायकल रॅली, फेब्रुवारीत पोलीस नियंत्रण कक्षाचे उद्घाटन तसेच आयुक्तालयात पोलीस महासंचालकांनी भेट, मार्चमध्ये अबालवृद्धांसह आनंद दिवस साजरा करण्याकरीता, विविध उपक्रम एप्रिलमध्ये कॉरिडॉर मोहीम, मे मध्ये पासपोर्ट शाखेचे उद्घाटन आणि मिसिंगच्या तपासात झालेला खुनाचा उलगडा, जूनमध्ये सशस्त्र दरोडा घालून घरफोडी करणाऱ्या घोडासहन गांगला अटक, जुलैमध्ये पोलीस महासंचालकांनी कार्यालयास दिलेली भेट, पोलीस उपयुक्त गुन्हे व परि मंडळ १ च्या कार्यालयाचे उद्घाटन, ऑगस्टमध्ये साक्षी ज्वेलर्स केस मधील भरदिवसा करण्यात आलेल्या खुनाचा कौशल्यपूर्ण तपास, सप्टेंबरमध्ये प्रेमभंगानवरून आत्महत्या करणाऱ्याचे प्राण वाचवले तसेच वसईत मतिमंद मुलीवर बलात्कार करणाऱ्यास अटक, ऑक्टोबर मध्ये आचोळे व पेल्हार पोलीस ठाण्याचे उद्घाटन, नोव्हेंबर मध्ये अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबवण्यात आली. वर्षभरात ९१७ अंमली पदार्थ विरोधी कारवाया करण्यात आल्या, डिसेंबर मध्ये दोष सिद्दीच्या प्रकरणात लक्षणीय वाढ होतेय प्रमाण ८२ टक्क्यांपर्यंत आले आहे.

आयुक्तालयाच्या स्थापनेच्या वेळी १३ पोलीस ठाण्याच्या हद्दीत फक्त १३ मोहल्ल्या कमिट्या होत्या. मात्र पोलीस आयुक्तांचा पुढाकाराने प्रत्येक पोलीस ठाण्याला बीटस्तरावर देखील मोहल्ला कमिट्यास्थापन करण्यात आल्या. सध्या १५ पोलीस ठाण्याच्या अंतर्गत ५६ मोहल्ला कमिटी कार्यरत आहेत. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मोठी मदत मिळते. सामाजिक सलोखा राखला जातो. २०२१ मध्ये शांतता कमिटीच्या १६७ बैठका झाल्या आणि त्यातून जनता आणि पोलीस यांच्यात चांगला समन्वय राखण्याचे उत्तम प्रयत्न झाले. जनतेच्या अडचणी आणि पोलिसांकडून असलेल्या अपेक्षांची माहिती मिळाली. पालघर जिल्ह्याला मोठा समुद्र किनारा लाभलेला आहे. २०२१ मध्ये आयुक्तालयाच्या हद्दीत भारतीय नौसेना, तटरक्षक दल व पोलीस असे संयुक्तपणे सागर सुरक्षेच्या दृष्टीने अभ्यास उपक्रम सागर कवच अभियान राबवण्यात आले. कोविडच्या संकट काळात पोलिसांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून अनेकांचे जीव वाचवले. या पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत कोव्हीड सेल स्थापन करण्यात आला होता. पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शाखा अंतर्गत कोव्हीड सेलच्या माध्यमात कोरोनाबाधित अधिकारी व अंमलदाराबाबत दैनिक स्तरावर त्यांच्या औषध उपचाराबाबत माहिती घेतली जाते. २११२ अधिकारी अमालदारांपैकी २०९५ अधिकारी व अमलदारांनी लसीकरण पूर्ण केले आहे. कोव्हीड सेलच्या माध्यमातून महापालिका अंतर्गत आरोग्य विभागाशी समन्वय साधून आयुक्तालयातील नागरिकांची एकूण रुग्ण संख्या कोव्हीड केअर सेंटर रुग्णालय येथे उपलब्ध बेडची संख्या याबाबत दैनंदिनी माहिती प्राप्त केली जाते. या काळात २७२५० नागरिकांना मास्कचे वाटप करण्यात आले, तर २९६०० सेनिटायझर व ११०० फेस शिल्ड वाटप करण्यात आले.

पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी गुन्हेगारीवर तर नियंत्रण आणलेच पण जनता आणि पोलीस यांच्यात कायम संवाद राहीला. यासाठी जेष्ठ नागरिक, परप्रांतीय विद्यार्थी यांच्याशी संवाद ठेऊन नशामुक्ती शिबिर, आरोग्य शिबिर, सायबर जनजागृती अभियान आदी प्रकल्प राबवून जनतेत पोलिसांच्या विषयी विश्वास निर्माण केला. त्यामुळे नागरिकांचे पोलिसांना सहाय्य मिळू लागले आणि आणि गुन्हेगारीच्या घटना डिक्टेक्ट होण्यास त्याचा फायदा झाला. स्ट्रीट क्राईमवर नियंत्रण मिळवण्यासाठी लोकसहभागातून ५२१६ सिसी टिव्ही कॅमेरे बसवण्यात आले. त्यामुळे अनेक गुन्ह्यांची उकल होण्यास मदत झाली. महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देताना ८/२/२०२१ रोजी आयुक्तालयाच्या कार्यकक्षेमधील अपहरण झालेली बालके आणि हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करण्यात आली. या अहवालात गुन्ह्यांची संख्या तसेच उकल झालेल्या गुन्ह्यांची सविस्तर आकडेवारी देण्यात आली आहे. २०१७ मध्ये चोरी घरफोडी, वाहन चोरी, खून, बलात्कार, विनयभंग, जुगार, दारूविक्री, दंगा आदी मिळून १७५६ गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी १६२६ गुन्ह्यांची उकल झाली. तर २०१८ मध्ये १५८५ गुन्हे दाखल झाले. त्यापैकी १५५२ गुन्हे उघडकीस येऊन आरोपींवर कारवाई झाली. २०१९ मध्ये १५२३ गुन्हे दाखल झाले. त्यापैकी १४८९ गुन्ह्यांची उकल झाली. २०२० मध्ये ३३३० गुन्हे दाखल झाले. त्यापैकी ३३०८ गुन्ह्यांची उकल झाली. २०२१ मध्ये २९९३ गुन्हे दाखल झाले. त्यामध्ये २९७८ गुन्ह्यांची उकल झाली. २०२० मध्ये २३,३४,५०,९८७ इतका माल चोरीला गेला. त्यापैकी ११,४४,८६,२८१ इतका माल हस्तगत करण्यात आला, तर २०२१ मध्ये २५,३४,२१,८४६ माल चोरीला गेला, त्यापैकी ११,७४,७३,०५८ इतका माल हस्तगत करण्यात आला. एकूणच काय तर नव्या पोलीस आयुक्तालयाच्या कामामुळे लोकांना दिलासा आणि विश्वास मिळाला आहे.

## मुंबई शहर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे प्रलंबित प्रकरणांसाठी विशेष मोहीम

मुंबई : जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, मुंबई शहर समितीमार्फत जात प्रमाणपत्रांच्या प्रलंबित प्रकरणांसाठी दिनांक १४ ते २८ फेब्रुवारी पर्यत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या अर्जदारांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी शैक्षणिक व सेवा विषयक प्रस्ताव सादर केलेला आहे व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, मुंबई शहर समितीकडे ज्या अर्जदारांचे जात प्रस्ताव अद्यापही कागदपत्रे, पुराव्या अभावी प्रलंबित आहेत, अशा सर्व अर्जदारांना त्रुटी पूर्तता करण्याबाबत समितीकडून कळविण्यात आलेले आहे. ज्या अर्जदारांनी अद्यापही त्रुटींची पूर्तता न केल्याने प्रकरणे प्रलंबित आहेत. अशा प्रलंबित प्रकरणांसाठी दिनांक १४ ते २८ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबत त्रुटीपूर्तता करण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे.दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ पर्यत त्रुटींची पूर्तता केली जाणार नाही अशी सर्व प्रकरणे फेब्रुवारी २०२२ अखेर बंद करण्यात येतील. तसेच संबंधित अर्जदारांना जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक असल्यास नव्याने प्रस्ताव सादर करावा लागेल.तरी विहित कालावधीमध्ये संबंधित अर्जदारांनी त्रुटी पूर्तता करावी, असे आवाहन मुंबई शहरचे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# सोलापूरात विवस्त्र करून अश्लील कृत्य करण्यास भाग पाडणाऱ्या टोळीला अटक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहर परिसरात लूटमार करण्याच्या यापूर्वी अनेक घटना घडल्या आहेत, परंतु गावठी पिस्तूल व गुप्तेचा धाक दाखवत आणि लोकांना विवस्त्र करून तसेच अश्लील कृत्य करण्यास भाग पाडून लुटणाऱ्या टोळीस जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली आहे, अशी माहिती सोलापूर शहर पोलीस उपायुक्त (परिमंडळ) डॉ.वैशाली कडूकर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. सोलापूर शहरातील जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक केतन मांजरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार काही तरुण जुना तुळजापूर नाका ते रुपाभवानी मंदिर दरम्यान रस्त्याने ये-जा करणाऱ्या लोकांना त्यांच्या जवळील पिस्तुलाचा धाक दाखवत व मारहाण करून, विवस्त्र करून व अश्लिल कृत्य करण्यास व शेण खाऊ घालण्यास भाग पाडणाऱ्या टोळीलाव लूटमार करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार महिला पोलीस निरीक्षक विजयालक्ष्मी कुर्री व त्यांच्या पथकाने रुपाभवानी मंदिराकडून जुना तुळजापूर नाक्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचून, सागर अरुण कांबळे (२२), बुद्धभूषण नागसेन नागटिळक (२६) सतीश ऊर्फ बाबुला अर्जुन गायकवाड (२५), अक्षय प्रकाश थोरात (२६) यांना ताब्यात घेऊन त्यांची अंगझडती घेतली. त्यावेळी त्यांच्या ताब्यातून एक गावठी पिस्तूल, एक धारदार गुप्ती, चार मोबाईल हँडसेट व दोन मोटरसायकल मिळून आल्या आहेत. मिळालेल्या मोबाईल व्हिडिओची दोन पंचांसमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये हे युवक त्यांच्याकडील गावठी पिस्तुलाचा धाक



दाखवून ये-जा करणाऱ्या लोकांची अडवणूक करीत होते. मिळालेल्या मोबाईल व्हिडिओची दोन पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये वरील इसम हे त्यांच्याकडील गावठी पिस्तूल चा व धारदार गुत्तीचा रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना धाक दाखवून त्यांची अडवणूक करून त्यांना मारहाण व दमदाटी करून जीवे मारण्याची धमकी देऊन त्यांना विवस्त्र करून त्यांना हस्तमैथुन व अनैसर्गिक संभोग करण्यास भाग पाडून, त्यांना शेण खाऊ घालण्यास भाग पाडून अश्लील कृत्य करण्यास भाग पाडून त्यांचे मोबाईलमध्ये व्हिडिओ रेकॉर्डिग करून ते आपापसात व्हॉट्सअॅपमध्ये प्रसारित केल्याचे दिसून आले. त्यामुळे नमूद चार इसमाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आले आहे. सदर या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक विजयालक्ष्मी कुर्री हे करत आहेत. अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर केले असता सात दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे.

सदरची कामगिरी सोलापूर शहर पोलीस आयुक्त हरीश बैजल, पोलीस उपायुक्त डॉ. वैशाली कडूकर, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.संतोष गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब भालचिम, पोलीस निरीक्षक विजयालक्ष्मी कुर्री यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक केतन मांजरे, पोलीस हवालदार आबा थोरात, पोलीस नाईक सुरेश जमादार, अतुल गवळी, खाजप्पा आरेनवरू, पोलीस कॉन्स्टेबल थिटे, राजेश घोडके, स्वप्नील कसगावडे, गोपाळ शेळके, दत्ता काटे, बाळू माने, बेळे, नागटिळक, सुहास गायकवाड यांनी बजावली आहे.

# बोरोळच्या सरपंचावर अविश्वास ठराव मंजूर

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील बोरोळ येथील सरपंच ललिता प्रमोद जवळदापके यांच्यावर अपहार व मनमानी कारभार करित असल्याचा आरोप करित सदस्यांनी मंगळवार ता.८ रोजी विशेष ग्रामसभेत दाखल केलेला अविश्वास ठराव बहुमताने मंजूर करण्यात आल्याने साडेचार वर्षात दुसऱ्यांदा अविश्वासाचा विजय झाला असून सहा महीन्यासाठी तिसऱ्या महिलेला सरपंच पदाची संधी मिळणार आहे. थेट जनतेतून मात्र मतदान न होता निवडून आलेल्या पहिल्या सरपंच अॅड.जयश्री पाटील यांच्यावर १० फेब्रुवारी २०२० रोजी दाखल करण्यात आलेल्या अविश्वास ठरावावर मतदान घेण्यात आले होते. यावेळी एकूण ८८१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. त्यापैकी अविश्वासाच्या बाजूने ७२३ तर विरोधात ८३ व ७५ मते बाद ठरली होती. त्यामुळे अविश्वासाचा विजय झाल्याने येथील सरपंच अड जयश्री पाटील यांना पायउतार व्हावे लागले होते. मतदानाद्वारे लोकनियुक्त सरपंचाला पदच्युत करण्याचा मराठवाड्यातील हा पहिलाच प्रयोग होता. त्यानंतर मंगळवारी ता.२ जून २०२० रोजी येथील ग्रामपंचायत कार्यालयात सर्वसाधारण गटातील महिलेसाठी राखीव असलेल्या सरपंच पदासाठी एकमेव ललिता जवळदापके यांचा अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली होती.

२०१७ साली बोरोळ ग्रामपंचायतीची निवडणूक बिनविरोध करित येथील पुढाऱ्यांनी तालुक्यात बोरोळ पटर्नची चर्चा मोठ्या प्रमाणात घडवून आणली. मात्र सरपंच व सदस्य यांच्या तील मतभेद सातत्याने उफाळून आल्याने अविश्वास ठराव दाखल करित मतदानाद्वारे सरपंच जयश्री पाटील यांना पदच्युत करण्यात आले होते. वीस महिन्याच्या आत पुन्हा विदयमान सरपंचावरही नमुना नंबर आठ ला नावे नोंदवीत असताना सभागृहात न मांडता परस्पर नोंद घेणे.नोंदीच्या कामात अकार्यक्षमता दाखवणे. चौदाव्या वित्त आयोगातून करभरणा केलेल्या किती व्यक्तीला व किती शिवणयंत्राचे वाटप केले याचा खुलासा न करणे .ग्रामनिधी खात्यातील निधीचा विकास कामासाठी खर्च न करता परस्पर अपहार करणे .प्राथमिक आरोग्य केंद्रातील आर.ओ.प्लान्ट च्या काईन बॉक्स मधील निधी कोणत्याही खात्यावर भरणा न करणे,पाझर तलावाचे परस्पर लिलाव करून ठरलेली रक्कम व अनामत परस्पर हडप करणे आदि कारणावरून अविश्वास ठराव सोमवारी ता.७ रोजी दाखल करण्यात येणार होता वरील माहिती ग्राम पंचायत सदस्यातुन सांगण्यात आली मात्र शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहीर केल्याने मंगळवारी ता.आठ रोजी दाखल करण्यात आला यावेळी दहापैकी आठ सदस्यांनी ठरावाच्या बाजूने हात उंचावून मतदान केले तर सरपंच व एक सदस्या रेणुका म्हेत्रे अनुपस्थित राहीले. यावेळी पिठासन अधिकारी म्हणून तहसीलदार सुरेश घोळवे यांनी काम पाहिले.

**पाच वर्षात तीन सरपंच तर दोन उपसरपंच**

थेट जनतेतून निवडून येणाऱ्या सरपंच पदाची निवडणूक गाव पुढाऱ्यांनी पुढाकार घेत बिनविरोध केली. मात्र सरपंच एका गटाचा तर तेरापैकी दहा सदस्य विरोधी गटाचे बिनविरोध निवडण्यात आले होते. त्यामुळे तुझ माझं पटेना म्हणून अविश्वासाचे कार्ड खेळण्यात आले. पण वीस महीन्यानंतर पुन्हा अविश्वास त्यामुळे पाच वर्षात तीन सरपंच तर दोन उपसरपंच विराजमान करित पुन्हा एकदा बोरोळ पॅटर्न राबविला आहे.

# औशात आठ लाख ३३ हजाराचा गुटखा जप्त



**औसा/प्रतिनिधी**

शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, सुगंधी तंबाखू व पानमसाल्याची तस्करी करणाऱ्या वाहानास औसा पोलिसांनी पकडून सुमारे मुद्देमाल १४ लाख ३३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी औसा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत अधिक माहीती अशी की, औसा पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक शंकर पटवारी यांना औसा पोलिस ठाणे हाद्दीतून एका स्कॉर्पिओ गाडीतून शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, सुगंधी तंबाखू व पानमसाल्याची तस्करी होणार आसल्याची खबर मिळाली होती. मिळालेल्या माहीतीवरून पोलिस निरीक्षक पटवारी यांनी औसा पॉइंट येथे सापळ लावला. दरम्यान स्कॉर्पिओ गाडी क्रमांक एम.एच. २४-ए.एफ.०५४८ ची झडती घेतली असता गाडीमध्ये आरएमडी पान मसालाचे दोन बॉक्स किंमत ४८ हजार, बाबा ब्लॅक सुगंधी जर्दा- ८ बॉक्स- १ लाख ६८ हजार, बाबा नवरत्न सुगंधी पान मसाला एक बॉक्स- २१ हजार, बाबा नवरत्न सुगंधी पान मसाला ४ बॉक्स (१००ग्रॅम पॅकिंग) ८४ हजार, रजनीगंधा पान मसाला- ५ बॉक्स- १ लाख ५५ हजार, रजनीगंधा पान मसाला (१००ग्रॅम पॅकिंग) ८ बॉक्स- ३ लाख २८ हजार, बाबा १५४- ५ बॉक्स- पाच हजार, बाबा १२०- चार बॉक्स-१२ हजार, बाबा १६०- चार बॉक्स- १२ हजार असा ८ लाख ३३ हजार रुपये किंमतीचा गुटखा आढळून आला. या प्रकरणी औसा पोलिसांनी स्कॉर्पिओ चालक बिलाल ईस्माईल शेख (वय ३४ वर्षे) रा. खोरी गल्ली लातूर यास ताब्यात घेतले. या कारवाहीत पोलिसांनी स्कॉर्पिओ गाडी अंदाजे किंमत सहा लाख रुपये व गुटखा, सुगंधी तंबाखू व पानमसाला असा एकून मुद्देमाल १४ लाख ३३ हजार औसा पोलिसांनी जप्त केला. अन्न व औषध प्रशासनाला याबाबत, औसा पोलिसाकडून माहीती देण्यात आली .त्यानुसार अन्न सुरक्षा अधिकारी नसरीन मुजावर यांनी जप्त मालाचे नमुने काढून त्याचा पंचनामा केला असुन बिलाल शेख यांच्या विरुध्द औसा पोलिसात अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस उपनिरिक्षक निलम घोरपडे ह्या करीत आहेत.

# तस्करी करणाऱ्या महिलेसह तीन जणांना अटक; ५० किलो गांजा जप्त

**विरार/प्रतिनिधी**



मीरा भाईंदर व वसई विरार परिसरात अंमली पदार्थ विक्री व तस्करी करणाऱ्या टोळी विरुद्ध कडक कारवाई करून त्यास पायबंद घालण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून पोलीस आयुक्तालयांतर्गत सर्व पोलीस ठाण्यांना सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलीस उपआयुक्त (गुन्हे) व सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाने गुप्त बातमीदारामार्फत आज (दि.१०) पहाटे वसई (पूर्व) येथे मुंबई-अहमदाबाद महामार्गावर गुजरात बाजूकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या रिक्षा क्र. एमएच४८/ बीएफ५३३४ या तीनचाकीला चिंचोटी जवळ ताब्यात घेतले. आरोपी अजय याचे (वय २७) रा. नालासोपारा (पूर्व), जय पाटील (वय २४) व एक महिला आरोपी (वय ४०) दोघे रा. दहिसर (पूर्व) मुंबई यांच्या कब्जातून उग्र वासाचा काळपट रंगाचा ५० किलो गांजा ज्याची किंमत ११ लाख ४४ हजार हा अमली पदार्थ हस्तगत केला. या आरोपींविरुद्ध वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. १६०/२०२२ एनडीपीएस कलम ८(क), २२(क), २५, २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास वालीव पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत. पोलीस उपआयुक्त (गुन्हे) डॉ. महेश पाटील, सहा.पो.आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोउप.निरीक्षक शिवाजी खाडे, पोउप.निरीक्षक उमेश भागवत, पोहवा. अशोक पाटील, पोना. मनोज चव्हाण, पोना. मुकेश तटकरे, पोना. सागर बारवकर, पोना. मनोज सकपाळ, पोना. शंकर शिंदे, सचिन घेरे, पोशि. राकेश पवार, पोशि. अश्विन पाटील सर्व नेम गुन्हे शाखा कक्षा-३ यांनी उत्कृष्टरित्या कामगिरी पार पाडली.

# सोलापुरात ११ गुन्हे उघडकीस सव्वा सहा लाखांचा मुद्देमाल जप्त



**सोलापू/प्रतिनिधी**

सोलापूर शहरातील जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने ११ गुन्हे उघडकीस आणून ६ लाख ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे, अशी माहिती सोलापूर शहर सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. संतोष गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारी वाढल्याने त्याचा शोध घेण्याचे आदेश वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी डीबी पथकाला दिले होते. त्यानुसार मोबाईलच्या बाबत तांत्रिक माहितीच्या आधारे मोबाईलचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले. झारखंड येथील आरोपी रतनलाल महतो (३३) याने अल्पवयीन मुलाच्या मदतीने कस्तुरबा मार्केट मध्ये दोन मोबाईल पळवले होते. तिसरा मोबाईल चोरत असताना नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले होते. त्याचप्रमाणे अर्श शेखव जमीर शेख यांना ताब्यात घेतले. त्यांची अधिक चौकशी करून चोरीचे ४ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. आरोपी सिद्धाराम ईरणा बमनाळे (२२) यांच्या ताब्यातून ७ हजारांची रोकड व एक तोळ्याचे सोन्याचे गंठण जप्त करण्यात आले. सागर बाळू मोरे (२१) व महेश बाबासाहेब कांबळे (२९) या दोघांकडून चोरीच्या दोन मोटारसायकली हस्तगत करण्यात आले आहेत. प्रमोद सोनवणे यांच्याकडूनही मोटरसायकल पोलिसांनी जप्त केली आहे. सेटलमेंट कॉलनी येथे राहणाऱ्या तीन महिलांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून दोन ग्रॅम सोन्याच्या रिंग जप्त केले आहेत. त्याचप्रमाणे फसवणुकीच्या गुन्ह्यातील बंडू हनुमंत माने याच्याकडून ट्रक जप्त करण्यात आला आहे. असे चोरीचे ११ गुन्हे उघडकीस आणून ११ आरोपींना अटक करून ६ लाख ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त हरीश बैजल, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब भालचीम, विजयालक्ष्मी कुर्री, डीबी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक केतन मांजरे, पोलीस अंमलदार आबा थोरात, के.पी.आरेनवरु, जमादार, गवळी, बागलकोटे, शेळके, गायकवाड आदींनी केली आहे.



## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'जी' वालीव, विभागीय कार्यालय जुचंद्र**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय जुचंद्र येथे झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय वालीव येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | जूचंद्र | JC02/589/28 | मनोज आर. गावडे | राकेश मांगीलाल प्रजापती/राधा मांगीलाल प्रजापती |
| २. | जूचंद्र | JC02/1300/41 | दयाशंकर बी. विश्वकर्मा | सुनिल आर. मिश्रा |
| ३. | जूचंद्र | JC02/1795/12 | राजाराम राजय्या शेंघडे | सिंथीया एडविन डिसोजा |
| ४. | जूचंद्र | JC02/1000/4 | विनोद लक्ष्मण कांबळे | जॉन फिलीप कुनेल/शिबा जॉन कुनेल |
| ५. | जूचंद्र | JC02/1752/2 | रजनी सिंग | मुन्नालाल यादव |
| ६. | जूचंद्र | JC02/1049/10 | नंदकुमार राजाराम तोडकरी | अॅग्रेल जे. पचेको/ नेपोलियन सॅमसन पचेको |
| ७. | जूचंद्र | JC02/1736/178 | प्रितम नाझरे | लदुराम माली/ निशा पुष्प |
| ८. | जूचंद्र | JC02/1775/39 | सरफराज खान | जयेश परमानंद सुथार/प्रियंका जयेश सुथार |
| ९. | जूचंद्र | JC02/1769/63 | माड कंन्ट्रक्शन | रविंदरसिंह करामसिंह दसोनी/ कमळा रविंदरसिंह करामसिंह दसोनी |
| १०. | जूचंद्र | JC02/1769/176 | प्रल्हाद त्रिपाठी | रामानंद शंभुनारायण त्रिपाठी |
| ११. | जूचंद्र | JC02/1752/374 | स्वरूप बी. मुखर्जी | रेवनाथ दशरथ गोडसे/ प्राजक्ता रेवनाथ गोडसे |
| १२. | जूचंद्र | JC02/594/42 | प्रताप सिंग मोहन सिंग दसोनी | कोमल सुरेश काजले |
| १३. | जूचंद्र | JC02/1775/49 | उषा कैलास यादव | राकेश शिवमुरत सिंह |
| १४. | जूचंद्र | JC02/1769/3 | रुची जगदिश राय | राजेश बिहारीलाल व्यास |
| १५. | जूचंद्र | JC03/651/45 | फ्रसिस फर्नांडिस/जुलिना एफ. फर्नांडिस | रॉबीनसन जेरॉम डिसोजा |
| १६. | जूचंद्र | JC04/819/34 | मेल्वीन फर्नांडिस | उषा नरेंद्र प्रताप सिंग |
| १७. | जूचंद्र | JC04/963/25 | सिलिंक कन्ट्रक्शन प्रा.लि. | परशुराम रामचंद्र पांडे/ रमी परशुराम पांडे |
| १८. | जूचंद्र | JC01/1205/20 | राजेश नंदलाल यादव | देवनारायण सिताराम चौधरी/ दिया देवनारायण चौधरी |
| १९. | जूचंद्र | JC01/885/15,16 | ओमसाई बिल्डरर्स अॅण्ड डेव्हलपर्स | भालचंद्र माणिक गोवारी |
| २०. | जूचंद्र | JC03/722/21 | सिलिंक कन्ट्रक्शन प्रा.लि. | सल्वाडोर मरियन डिसोजा |

जावक क्र. वविशम/विवा/१३६६/२०/२०-२२
दिनांक : २७/१०/२०२१

**सही/-**
**प्र. सहाय्यक आयुक्त**
**प्रभाग समिती 'जी' वालीव**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

14 TO 20 FEBRUARY 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 12/02/2022 8:38 PM Page 1



## पान १ वरून....

### दोघांमधील वाद पोलिसांपर्यंत गेला...

आहे याची चर्चा इचलकरंजी शहरात होऊ लागली. या घटनेनंतर अवघ्या १२ तासात या घटनेतील संशयीत आरोपी श्रवणकुमार दायमा याला शिवाजीनगर पोलीसांनी ताब्यात घेऊन त्याचकेडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता त्याने पोलीसाना दिलेली माहिती अंचबित करणारी होती. त्याने पोलीसाना व्यक्तीगत कारणातून सुरेश गडगे यांचा खून केल्याचे सांगितले. गडगे याचा खून करण्याला व्यक्तीगत असे कोणते कारण होते ते त्याने स्पष्ट केले नाही. त्यामुळे या खूनामागील स्पष्ट कारण पोलीसाना शोधता आले नाही. भ्रष्टाचार विरोधी जन क्रांती आघाडीचे काम इचलकरंजी शहरातील सुरेश गडगे हे पाहतात. शहरातील कोणताही सामाजिक प्रश्न असो त्या प्रश्नासंदर्भात जन आंदोलन करण्यात ते आणि त्याची जन क्रांती आघाडी ही पुढे असते. त्यामुळे त्याच्या विषयीचा रोष हा अनेकांच्या मनात निर्माण झालेला आहे. सामाजिक काम करण्याला कोणतेही मर्यादा नसल्याने पाणी प्रश्न असो, यंत्रमाग कामगाराचा प्रश्न असो किंवा रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा कारखान्याने कबनुर केटकाळे नगर येथील आडव्या रस्त्यावर बांधलेल्या डिस्टली प्रकल्पाचा जिना आणि कमान यासारख्या प्रश्नात सुरेश गडगे यांनी वेळोवेळी लक्ष घातल्याने ते कायम चर्चेत असायचे. आण्णा हजारे प्रणीत भष्ट्राचार जन आदोलनात त्यांनी हिरहिरीने भाग घेतला. कदाचित याच कारणातून ते लोकांच्या डोळ्यात खूपत होते. सामाजिक काम करीत असताना त्याना अनेकांनी विरोध केला. तरी ही त्यांनी आपले सामाजिक काम कधी सोडले नाही. उलट आपल्या सोबत अनेक कार्यकर्त्याचा मोहळ जमवून आधिक प्रमाणात ते काम करीत राहिले. अलिकडच्या दोन तीन वर्षापासून ते आपल्या कुंटूंबासह इंदिरा हौसिंग सोसायटीत राहयला होते. ते इचलरकंजी नगरपालिकेचे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रक्टर म्हणून ही काम करीत होते. हे काम करीत असताना ते आण्णा हजारे याच्या कामाने प्रभावीत झाल्याने इचलकरंजी शहर परिसरात भ्रष्टाचार निर्मुलनाचे काम करू लागले. त्यातून त्याचा अनेकांशी संबंध आला. ते एका राजकीय पक्षाशी ही जोडले गेले. त्याच परिसरातील स्वामी अपार्टमेंट येथे श्रवणकुमार दायमा हे ही राहयला आहेत. श्रवणकुमार दायमा हे अर्किटेक्ट इंजिनियर म्हणून काम करतात. त्यांनी काळ पुण्यात नोकरी करून परत इचलकरंजीला आल होते. तसे ते सणकी आणि रागीट स्वभावाचे होते. त्याना कुणी काही बोललेले खपत नव्हते. मारामारी करण्यात त्याचा पुढाकार होता. सन २०१७ मध्ये एका मारामारी प्रकरणी गवाभाग पोलीसात त्याचेवर गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यावेळी याला पोलीसांनी समज देवून सोडले होते. उच्चशिक्षितीत पण भरकटलेला अशी त्याची अवस्था होती. सुरेश गडगे आणि दायमा याची मागे एकदा किरकोळ कारणावरून वादावादी झाली होती. एका प्रकरणात ते दोघे ही अमोरा समोर आले होते. सुरेश गडगे हे नियमावर बोट ठेवून त्याचेशी भांडत असताना तो ही त्याचेशी उद्धटपणे बोलत त्यांना बघून घेण्याची भाषा करीत होता. त्यावेळी झालेल्या भांडणात दायमाने गडगे याच्या मोटार सायकलीवर दगड ही घातला होता. त्यावेळी गडगे यांनी कागदपत्रासह त्याचे विरोधात पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली होती त्यांनी दिलेल्या तक्रारीत श्रवणकुमार दायमा याच्या पासून आपल्या जीवाला धोका आहे असे नमूद केले होते. त्यामुळे त्या प्रकरणात पोलीसांनी त्याला अटक करून ताब्यात घेतले होते. त्याचेकडे त्यावेळी चौकशी केली असता त्याने आपण रागाच्या भरात गडगे याना तसे बोलल्याचे सांगितले त्यावेळी ही पोलीसांनी त्याला समज देवून सोडले होते. त्यावेळेपासून दायमा याचा गडगे याचेवरती राग होता. काही करून एकदा गडगे याना कायमचा धडा शिकवयाचा असा विचार त्याने केला होते. गडगे याच्यावरती त्याचा व्यक्तीगत राग होता. त्याना बघितले की तो मनातून चरफडत होता. ते असतील सामजिक सेवक त्याच्याशी आपले काही घेणे देणे त्यांना दुसऱ्याची मापे काढण्याचा अधिकार कुणी दिला असे तो म्हणत होता. मी ही काही कमीचा नाही,त्याना अद्दल घडविल्या खेरीज राहणार नाही असे तो आपल्या मित्रात बोलत होता.त्याच्या बोलण्यातून गडगे याचेवरील राग उफाळून येत होता. मी गडगे याना सपंविणारच असे तो म्हणत होता. तो आर्क्टिटेक इंजिनियर असल्याने असे काही करेल हे कोणाला वाटत नव्हते. मंगळवार दि.८ फेब्रुवारी २०२२ रोजी गडगे हे जेवण खान करून रात्री ११च्या दरम्यान आपल्या घराच्या बाहेर येवून थांबले होते. ते भागातील मोकाट कुत्र्यांना खाऊ घालत होते. त्याची पत्नी आणि मुलगा घरात त्यावेळी टीव्ही पाहत होते. गडगे हे कुत्र्याना खाऊ घालत असताना त्याचे भावेती चार पाच कुत्री होती. त्यांना जवळ करीत ते त्याचेसमोर पावाचा तुकडा फेकत असताना अचानक त्याचेसमोर दायमा आला. गडगे याना काही कळायच्या आतच दायमाने त्याच्या मानेवर, हातावर आणि पोटावर आपल्याकडील चाकूने सपासप वार केले. आपल्या ताकदीनिशी वार केल्याने गडगे याच्या वर्मी बसले होते. ते ओरडतच जमीनीवर रक्ताच्या थारोळ्यात खाली पडले. त्याच्या ओरडण्याने घरातून त्याचा मुलगा व पत्नी धावतच बाहेर आले. ते येवून पाहतात तर गडगे हे रक्तताच्या थारोळ्यात विव्हळत पडलेले दिसले त्यांनी ही आरडा ओरडा करायला सुरूवात केल्यावर आजुबाजुचे लोक ही घटनास्थळी धावत आले. त्यांनी गंभीर जखमी असलेल्या गडगे याना त्याच्या मुलाच्या मदत्तीने एका रिक्षात घालून लगेच इंदिरा गांधी सामान्य रूग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी त्याना तपासून उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. सामाजिक कार्यकर्ते सुरेश गडगे याचा निर्घृण खून झाल्याची बातमी सोशल मिडियावर व्हायरल झाल्याने इचलकरंजी शहरासह परिसरात एकच खळबळ उडाली. ज्याच्या त्याच्या तोंडात हे कसे झाले एवढेच होते.सुरेश गडगे याच्या खूनाने मागील काही वर्षापूर्वी झालेल्या दत्ता पाटील या सामाजिक कार्यकर्त्याच्या खूनाची ही चर्चा होऊ लागली होती.घटनेच्या वेळी सुरेश गडगे याचेवर वार करून दायमा याला पळून जाताना गडगे याचा मुलगा साकेत गडगे याने पाहिले होते. ही घटना शिवाजीनगर पोलीसाना समजातच पो.नि.महादेव वाघमोडे हे आपल्या सहकार्यासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेची पाहणी करून साकेत गडगे याच्याकडून घटनेची माहिती घेतली. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपासाची योग्य दिशा ठरवून संशयीत आरोपीचा माग काढणेचे काम सुरू केले.या घटनेचा तपास पोलीस वेगवेगळ्या ॲगलनी करीत होते.कारण सामाजिक कार्यकर्ते हे पैसे घेवून काम करतात त्यातून त्याचे कोणाशी तरी वौर वाद होत असतो आणि त्या वादातूनच खूनाच्या घटना घडतात अशी एक चर्चा सर्व सामान्य लोकाच्यातून ऐकायला मिळते पोलीस त्या अनुषंगाने ही तपास करीत होते. परंतु या घटनेत तसा कोणताच प्रकार दिसून येत नव्हता. मयत सुरेश गडगे याचा मुलगा साकेत गडगे याने दिलेल्या फिर्यादीत श्रवणकुमार दायमा याच्या विषयी माहिती दिल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. घटनेनंतर पोलीसांनी संशयीत दायमा याच्या मोबाईल कॉलचे लोकेशन काढून त्यांचा शोध घेत असताना तो इचलकरंजी परिसरातच असल्याचे दिसून येत होते. त्याच्या शोधासाठी पोलीसांनी दोन पथके तयार केली होती.त्यातील एका पथकाला तो नविन नगरपालिकेच्या समोरील जयभीम झोपडपट्टी येथे असणाऱ्या पाण्याच्या टाकीजवळ लपून बसल्याची माहिती मिळाली. तेथे पोलीसानी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. मयत सुरेश गडगे याचा मुलगा साकेत गडगे याने दिलेल्या फिर्यादीनुसार सुरेश आण्णाप्पा गडगे (वय ५७) याच्या खून प्रकरणी श्रवणकुमार दायमा (वय ४०) याचे विरूध्द भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपण सुरेश गडगे याचा खून व्यक्तीगत कारणातून केल्याचे पोलीसाना सांगितले. परंतु पोलीसाचा त्याचे सांगण्यावर विश्वास बसत नव्हता. कारण त्याचा खून करण्याला व्यक्तीगत कारण असे कोणते असेल याचा उलगडा ही पोलीसांना होत नव्हता. नक्कीच यामागे काही तरी वेगळे कारण असावे याची शक्यता पोलीसांना वाटत होती.म्हणून पोलीसांना वाटत होती. पोलीसांनी दायमा याला इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर उभे केले असता.मा.कोर्टाने त्याला १६ फेब्रुवारी २०२२ पर्यतची पोलीस कोठडी सुनवाली होती. या घटनेचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरी.महादेव वाघमोडे याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत. गडगे हे त्याच्या हत्यपूर्वी ही सामाजिक कार्यात सक्रीय होते. त्यांनी एका साखर कारखान्याच्या प्रदुषणाच्या बाबतीत ही पाठपुरावा चालु ठेवला होता. हिच त्याची शेवटची लढाई ठरली होती.

### सिगारेटवरून झालेला वाद जीवघेणा ...

मात्र काही वेळाने या चौघा जणांसोबत जवळपास १५ ते २० जणांचं टोळकं दुकानाजवळ आलं. सिगरेट न दिल्याच्या आणि वाद घातल्याचा राग मनात ठेवून त्यांनी सतेंद्र कुमारच्या किराणा दुकानावर हल्ला चढवला. काही हल्लेखोर दुकानाचे शटर आणि खिडकी तोडून घरात घुसले. सतेंद्रच्या बचावासाठी आलेल्या तिघा जणांना त्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत वडील विनोद सिंग यांचा जागीच मृत्यू झाला, तर तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. बोईसर पोलीस ठाण्यात या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर ७ आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तीन जखमी व्यक्तींवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

### कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ झाला...

करतो. या कारणावरून आपल्या मुलाच्या मदतीने पतीला ठार मारून सातव्या माळ्यावरून खाली फेकले आणि त्याने आत्महत्या केल्याचा देखावा निर्माण केला. मात्र पोलिसांनी मायलेकाचा हा बनाव हाणून पाडून त्यांना अटक केली. अंधेरीमध्ये राहणाऱ्या स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाच्या (सिडबी) सहव्यवस्थापकाची त्याची पत्नी आणि मुलाने सातव्या मजल्यावरून खाली ढकलून हत्या केली. संतनकृष्णन शेषाद्री असे या सहायक व्यवस्थापकाचे नाव असून, अंबोली पोलिसांनी त्यांच्या पत्नी जयशीला आणि मुलगा अरविंद या दोघांना अटक केली. पोलिसांना संशय येऊ नये यासाठी या दोघांना ही आत्महत्या असल्याचे भासविले. मात्र घटनास्थळाचा बारकाईने पंचनामा करून पोलिसांनी काही तासांतच ही हत्या असल्याचे उघडकीस आणले. अंधेरी पश्चिमेकडील वीरा देसाई मार्गावर असलेल्या सिडबी बँकेच्या ऑफिसर क्वार्टर्समध्ये सातव्या मजल्यावर संतनकृष्णन शेषाद्री हे पत्नी आणि मुलासह वास्तव्यास आहेत. शुक्रवारी पहाटे साडेचारच्या सुमारास संतनकृष्णन सातव्या मजल्यावरून खाली कोसळले. काही वेळाने जयशीला आणि अरविंद जोरजोरात ओरडू लागल्याने आजुबाजूचे रहिवासी जागे झाले. उडी मारली, आत्महत्या केली असे ते ओरडत होते. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांना देखील त्यांनी तेच सांगितले. मात्र पोलिसांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या संतनकृष्णन यांचे बारकाईने निरीक्षण केले असता, त्यांच्या हाताची नस कापली असल्याचे लक्षात आले. संशय आल्याने पोलिसांनी घरात जाऊन पाहणी केली, त्यावेळी भिंतीवरील आणि लादीवरील रक्ताचे डाग पुसलेले आढळले. पोलिसांनी या सर्वावर बोट ठेवताच जयशीला आणि अरविंद यांनी हत्येची कबुली दिली. संतनकृष्णन हे प्रत्येक कामात आळशीपणा करत होते व खर्चासाठी पैसे देत नव्हते. ते दररोज भांडण करायचे. वडील व पती म्हणून कुठल्याही जबाबदाऱ्या पार पाडत नव्हते. त्यांच्या वागण्याचा खूप त्रास होत असल्यामुळे आम्ही त्यांना मारण्याचे ठरविले, अशी माहिती जयशीला आणि अरविंद यांनी चौकशीत पोलिसांना दिली.

### अफाट पैसा मिळवण्याचा नोकराचा...

चाव्याही त्याच्याचकडे असतात. त्यानंतर कच्चा माल म्हणजे सोने आणि अन्य साहित्य घेऊन येणं, सोन्याच्या तयार साखळ्या जबाहिन्याकडे पोहोचविणं, कारखान्यात सोन्याच्या तारा आणि तयार साखळ्या व्यवस्थित लावून ठेवणं अशी महत्त्वाची कामंही गणेशला करावी लागतात. कारखान्यात तो अकुशल कामगार म्हणून जरी काम करीत असला तरी त्याच्या कामसू आणि प्रामाणिकपणामुळे 'जेनीशा ज्वेल्स आर्ट प्रा.लिमिटेड कंपनीचे मालक खुशाल रसीकलाल टामका यांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास होता. त्याच्या व अन्य कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणाचा आणि सचोटीचा टेमका यांना रास्त अभिमान होता. मात्र त्या दिवशी रात्री १.३० वाजताच्या सुमारास गणेशकुमार देवाशी व त्याचे साथीदार रमेश प्रजापती तसेच त्यांचे इतर ३ साथीदारांनी फिर्यादी यांचे कार्यालयातील तिजोरीत ठेवलेले १७ किलोचे विविध सोन्याचे दागिने व रोख रक्कम ८ कोटी ५७ लाख ९० हजार रुपयांपैकी ८ कोटी १९ लाख ६७, हजार ८७१ रुपये किमतीचा माल कार्यालयातील सीसीटिव्हीच्या डिव्हिआस्सह चोरून नेला होता चोरीची माहिती मिळताच खुशाल टेमका यांना धक्का बसला. त्यांनी लगेच लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाण्याचा नंबर फिरवला. 'लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाणे, सीनियर इन्स्पेक्टर ज्योती देसाई बोलतोय. 'मॅडम, इथे मोठी चोरी झालीय!' घाबरलेल्या आवाजात टेमका म्हणाले. हे बघा, शांतपणे सगळं काही सांगा. इथे म्हणजे नक्की कुठे? तुम्ही कोण बोलता आहात? व्यवस्थित सांगा.' 'माफ करा मॅडम, मी गोंधळून गेलोय. माझं नाव खुशाल टेमका. मी भुलेश्वर, दुसरी फोपळवाडी, मुरती हॉटेलजवळ राजमहल नावाची बिल्डिंग आहे. या बिल्डिंगच्या चौथा माळ्यावर जेनीशा ज्वेल्स आर्ट प्रा. लिमिटेड या सोन्याचे दागिन्यांचे कार्यालयातून बोलतोय. माझ्या कार्यालयातून १७ किलो सोन्याची चोरी झाली आहे. ठीक आहे, तुम्ही तिथेच थांबा. कोणत्याही वस्तूला हात लावू नका. पाच मिनिटांत आम्ही तिथे येतोच. ज्योती देसाई मॅडम या पथकासह तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी प्रथम सर्व परिस्थितीची पाहणी केली. फर्निचर आणि अन्य वस्तु विखुरल्या गेल्या होत्या. टेबलाचे व कपाटाच खण उघडे पडले होते. कपाटात ठेवलेले सर्व दागिने चोरीला गेले होते. पोलिसांनी खुशाल टेमका यांची फिर्याद लिहून घेतली. रीतसर पंचनामा केला. या प्रकरणी खुशाल टेमका यांच्या तक्रारी वरून लो. टि.मार्ग पोलीस ठाण्यास गु.र. क्र.९/२२, कलम ३८१, २०१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी मुंबई पोलीस आयुक्त हेमंत नगराळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) विश्वास नांगरे पाटील, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रादेशिक विभाग), दिलीप सावंत, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ -२) डॉ. सौरभ त्रिपाठी यांच्या देखरेखीमध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त, पायधुनी विभाग समीर शेख आणि लो. टी.मार्ग पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती देसाई यांच्या नेतृत्वातील पोलीस निरीक्षक (गुन्हे) ओम वगाटे सायबर पथकाचे सपोनि. नितीन कदम, पोउनि. प्रदिप लाड, पोउनि. उगले, पोउनि.विनोद पवार, पोउनि लहामगे, पोउनि अरूण जाधव व लो. टि. मार्ग, पायधुनी तसेच व्हि.पी. रोड पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार यांनी तपास सुरू केला. ही पोलीस पथके तपासकामी राजस्थान व आरोपींच्या लोकेशनच्या ठिकाणी रवाना झाली. तसेच परिमंडळ -२ कार्यालय आणि वपोनि. देसाई यांचे नेतृत्वात सपोनि बनकर, सपोनि. डिगे, पोउनि जमदाडे व पोलीस अंमलदार मुन्ना सिंग यांचे सायबर पथक पोलीस ठाणे येथे तांत्रिक तपासकामी नेमण्यात आले. या दोन्ही पथकांनी अहोरात्र परिश्रम घेवून आरोपींचा तांत्रिक तपासामध्ये मिळेल त्या लोकेशनवर व बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी सतत मागोवा घेवून गुन्ह्यातील पहिला आरोपी रमेश देवरामजी प्रजापती (वय २१) यांस सापळा रचून दि.१८ जानेवारी रोजी राजस्थान मधील रेवदर बस स्थानक, सिरोही येथून ताब्यात घेतले. पोलिसांनी रमेशचा कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्यातील चोरीचे सोन्याचे दागिने एका शेतातील जमीनीमध्ये लपवून ठेवल्याचे सांगितले. पोलीस त्याला त्या ठिकाणी घेऊन गेले असता त्याने ९०७०.९१ ग्रॅम वजनाचे ४ कोटी १५ लाख २२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम १५ हजार ६३० रुपये काढून दिले. पोलिसांनी तो सर्व माल हस्तगत केला. पोलिसांनी आणखी त्याच्याकडे कसून चौकशी केली तेव्हा त्यांनी गुन्ह्यातील बराच मोठा मुद्देमाल राजस्थान मधील काही आरोपीकडे ठेवल्याचे सांगितले.

पोलिसांनी त्या आरोपीचा शोध घेऊन दि. २१ जानेवारी रोजी हिंमतसिंह मोहनसिंह बालिया (वय ३०) रा. बालदा, ता. जि. सिरोही, राजस्थान २) लोकेंदर पुरणसिंह राजपुत (२५) व प्रल्हादसिंह डुंगरसिंह चौहाण (२६) या तिघांना अटक केली. त्यांचेकडून एकूण १४४०.१९ ग्रॅम वजनाचे ६६ लाख ४० हजार ५९७ रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले. या तिघांच्या चौकशीत गुन्ह्यातील काही आरोपी हे मध्य प्रदेशतील इंदोर येथे पळून गेल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी शोध मोहीम राबवून २२ जानेवारी रोजी गुन्हयातील मुख्य आरोपी फिर्यादीचा नोकर गणेशकुमार हिराराम देवासी (२१) यांस नंदलाल नगर, इंदौर येथील भैरवनाथ वेफर्स दुकानासमोरून ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या तपासात गुन्ह्यातील त्याचे साथीदार कैलासकुमार मंगलाराम तुरी भाट (२२) व किसन प्रल्हाद चौहाण (त्रिगर), (२१) राजस्थान यांना ग्राम सागंवी, पो. राजपुर, ठाणा नागलवाडी, ओझर, मध्य प्रदेश येथून ताब्यात घेवून या गुन्हयात अटक केली. नमूद आरोपींना मुंबई येथे आणून त्यांची पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली व त्याच्याकडून दि २५ रोजी तपासादरम्यान राजस्थान येथून त्यांनी चोरलेले ३८७८.०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने १, कोटी ७८ लाख ८९ हजार २१३ रुपये व रोख रक्कम रूपये २ लाख ५२ हजार इतकी मालमत्ता हस्तगत केली. या आरोपींना राजस्थानमध्ये आश्रय देणारे व त्यांचेकडून चोरीची मालमत्ता स्विकारणारे आरोपी श्यामलाल मोहनला सोनी (५८), विक्रमकुमार सोगाराम मेघवाल वास (२२) आणि उत्तम पन्नाराम घांची (२८) राजस्थान यांना दि.२४ जानेवारी अटक केली. त्यांचेकडून एकूण १०५४.७० ग्रॅम वजनाचे सोन्याचे धातुचे दागिने किंमत रुपये ४८लाख ६५ हजार ३३० रुपये व रोख रक्कम रुपये ७५ हजार रुपये अशी मालमत्ता हस्तगत करण्यात आली. आतापर्यंत या गुन्ह्यात एकूण १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हयात सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकूण ८ कोटी १९ लाख ६७ हजार ८७१ इतकी मालमत्ता चोरीस गेली होती. त्यापैकी सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकूण ७ कोटी १२ लाख ६० हजार रुपये इतक्या किमतीची मालमत्ता पोलीसांनी आरोपींकडून हस्तगत केली आहे. पण या आरोपीनी ही चोरी का आणि कशासाठी केली? याची माहिती घेतली असता तपासात धक्कादायक बाब पुढे आली. या चोरीच्या गुन्ह्यातील सर्व आरोपी हे राजस्थान मधील एकाच गावातील रहिवाशी आहे. ते लॉकडाऊनमुळे बेकार झाले होते. विशेष म्हणजे यातील आरोपी रमेश प्रजापती याचा नुकताच साखरपुडा झाला होता. लग्नासाठी खर्च येणार असल्याने त्याला पैशाची गरज होती. त्यामुळे त्याने इतर साथीदारांच्या मदतीने चोरीचा कट आखला. सुदवाने मालक खुशाल टामका यांचे वडील आजारी असल्याने ते कार्यालयात फारसे येत नव्हते. काही दिवसातच त्यांच्या वडिलांचे कर्करोगाने निधन झाले. हे समजताच त्यांना आनंद झाला .आता मालक दुकानात येणार नाही हे लक्षात आल्यावर गणेशकुमार देवाशी व रमेश प्रजापती यांनी राजस्थान मधील रेकॉर्ड वरील आरोपी कैलासकुमार मंगलाराम तुरीभट याला मुंबईत बोलावून घेतले. ८ जानेवारीला तो मुंबईत आला. मालक दुकानात येत नसल्यामुळे मालकाचा विश्वासु नोकर गणेशकुमार देवाशी, रमेश प्रजापती, कैलासकुमार मंगलाराम तुरीभट व इतर तीन साथीदारांनी १४ जानेवारी २०२२ रोजी रात्री १.३० वाजताच्या सुमारास जेनीशा ज्वेल्स आर्ट प्रा. लिमिटेड मधील कार्यालयात ठेवलेले १७ किलो सोन्याचे दागिने लंपास केले. विशेष म्हणजे हे दागिने गोरेगावमध्ये भरणाऱ्या प्रदर्शनात ठेवण्यासाठी आणले होते पण प्रदर्शन काही कारणास्तव पुढे ढकलल्या गेल्यामुळे मालकाने ते जेनीशा ज्वेल्स आर्ट प्रा. लिमिटेड मधील कार्यालयात आणून ठेवले. याची पूर्ण कल्पना गणेश देवाशी याला होती. दरम्यान हे सर्व १७ किलोचे दागिने चोरी करून ते ओला कारद्वारे बोरीवली संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे गेले. तेथून त्यांनी राजस्थान पालनपुर गाठले. पालनपूरहुन वाहन बदलून त्यांनी रेवधर गाठले. यावेळी पोलीस आपल्या पर्यत पोहचून नये म्हणून चोरांनी थेट मोबाईल कॉल न करता हॉट स्पॉट वरून व्हॉट्सॲपच्या कॉलींगद्वारे कॉल करत होते तर कधी वाहन चालकाच्या मोबाईल वरून कॉल करत होते. हॉटेलच्या वेटरच्या मोबाईल वरून ही आरोपीने कॉल केले. असे करत करत ते शिरोटी अबू रोड येथील गावी आले. गावातील एका गो शाळेत त्यांनी दागिन्यांचे वाटप केले. यामध्ये गणेशने स्वतःसाठी ७ किलो सोन्याचे दागिने ठेवले. तर प्रजापती ९ किलो दागिने घेतले. तसेच इतर आरोपींना हातात येईल तसे कमी जास्त दागिने व काही रोख पैसे दिले. प्रजापतीने त्याच्या वाट्याला आलेले दागिने शिरोहितील पडीक शेतजमिनीत ६ ते ७ फूट खोल खड्डा खणून त्यात ते दागिने गहाडून ठेवले. नंतर प्रजातीने ९ किलो दागिने शेतजमीतून काढून दिले. गणेश कुमार हा विश्वासु नोकर असल्याने तो गाव सोडून मध्यप्रदेश येथे पळून गेला तर काही आरोपी भीतीने पळून गेले. इतकी दक्षता घेऊन ही ते पोलिसांच्या नजरेतून सुटले नाही. यातील कैलासकुमार या आरोपीने त्याच्या एका नातेवाईकला फोन केला. त्या लोकेशन वरून पोलिसांनी त्याचा बिकानेर ते इंदौर असा १४ तासाचा प्रवास करून या १० ही चोरांना जेरबंद केले. या चोरट्याकडून पोलिसांनी गुन्हयातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकूण ८ कोटी १९ लाख ६७ हजार ८७१ इतकी मालमत्ता चोरीस गेली होती. त्यापैकी ७ कोटी १२ लाख ६० हजार रुपये इतक्या किमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश येथे १४ दिवस कौशल्यपूर्ण तपास करून पोलिसांनी हा गुन्हा उघडकीस आणला आहे. मुंबई पोलीसांनी तपासात दाखविलेली कौशलता व कार्यतत्परता तसेच गुन्ह्यातील अटक आरोपींकडून चोरीस गेलेली ९०% मालमत्ता हस्तगत केल्याने व्यापाऱ्यांनी तसेच फिर्यादी यांनी मुंबई पोलीसांचे मनापासून कौतुक करून आभार व्यक्त केले आहेत.

मुंबई पोलीस आयुक्त हेमंत नगराळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) विश्वास नांगरे पाटील, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रादेशिक विभाग), दिलीप सावंत, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ -२) डॉ. सौरभ त्रिपाठी यांच्या देखरेखीमध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त, पायधुनी विभाग समीर शेख आणि लो.टी.मार्ग पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती ज्योती देसाई यांच्या नेतृत्वातील पोलीस निरीक्षक ( गुन्हे) ओम वगाटे सायबर पथकाचे सपोनि. नितीन कदम, सपोनि बनकर, पोउनि प्रदिप लाड, पोउनि उगले, पोउनि विनोद पवार, पोउनि लहामगे, पोउनि अरूण जाधव, डिगे, पोउनि जमदाडे व पोलीस अंमलदार मुन्ना सिंग यांचे सायबर पथक व लो. टि. मार्ग, पायधुनी तसेच व्हि.पी. रोड पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार यांनी अहोरात्र परिश्रम घेवून हा गुन्हा उघडकीस आणला आहे.

## पान ८ वरून...

### वैद्यकीय क्षेत्रातील बांधवाचे आंदोलन...

सचिवांनी दिलेली अपमानास्पद वागणूक हे सरकारच्या अहंकाराचे प्रतिकच असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्याचे मुख्यमंत्रीच मंत्रालयात दोन-दोन वर्ष येत नसतील तर त्याच मंत्रालयातील अधिकारी अशाच पद्धतीने वागणे अपेक्षीत आहे. त्यांच्यावर सरकारचा अंकुश नसल्यामुळे या अधिकार्यांची मनमानी सुरु असल्याचेही आ. निलंगेकरांनी यावेळी सांगितले. वैद्यकीय बांधवानी ज्या मागण्या मांडलेल्या आहेत त्या अतिशय रास्त असून या मागण्या शासन दरबारी मांडत त्या मान्य करून घेण्यासाठी आगामी अधिवेशन काळात प्रश्न उपस्थित करून त्यासाठी पाठपुरावाही करण्यात येईल अशी ग्वाही आ. निलंगेकरांनी यावेळी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधताना दिली. त्याचबरोबर ज्या सचिवाने अपमानास्पद वागणूक दिली आहे त्यांना पदमुक्त करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल असा विश्र्वास यावेळी देण्यात आला. वैद्यकीय बांधवानी आंदोलन सुरु केलेले असले तरी त्यांनी रुग्णसेवेला प्राधान्य दिले असल्याबद्दल त्यांचे आभारही आ. निलंगेकरांनी यावेळी मानले. याप्रसंगी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. उदय मोहिते-पाटील, जिल्हाध्यक्ष डॉ. उमेश कानडे, सचिव डॉ. गणेश बंदखडके, डॉ. शैलेंद्र चौहान, डॉ. डोपे, डॉ. बनसोडे, डॉ. चावडा, डॉ. होळीकर, डॉ. कंदाकुरे, डॉ. होळंबे मॅडम, डॉ. राम मुंडे आदींसह संघटनेचे पदाधिकारी व वैद्यकीय बांधव उपस्थित होते.

### 'जैयस्वाल सेवा संस्थे'च्या अध्यक्षपदी...

उपाध्यक्ष संगीता जैयस्वाल, राहुल जैयस्वाल, सुनील परदेशी, गुरुदेव जैयस्वाल, सरचिटणीस विनोद जैयस्वाल, कोषाध्यक्ष रामानंद जैयस्वाल, अतुल जैयस्वाल, जितेंद्र जैयस्वाल, प्रमोद गुप्ता, मिंटुराम जैयस्वाल, श्रीप्रकाश गुप्ता, कृष्णचंद जैयस्वाल, विसर्जन गुप्ता, रामाआसरे जैयस्वाल, कृष्णकुमार जैयस्वाल, संतोष जैयस्वाल आदी नवीन कार्यकारिणी स्थापन करण्यात आली.

### सामूहिक शेतीतून बांबू लागवड...

संदर्भात पाशा पटेल यांनी देशभरात दीड हजारापेक्षा अधिक सभा घेतल्या आहेत. पर्यावरण रक्षणासाठी वृक्ष लागवडीची गरज आहे. राज्य शासनाने त्याकरिता 'माझी वसुंधरा' अभियान सुरू केले आहे. या अंतर्गत देखील बांबू लागवड करता येईल, असेही ते म्हणाले. आ.अभिमन्यू पवार यांनी पाशा पटेल हे कृषी क्षेत्रातील क्रांतिकारक असल्याचे म्हटले. पाशा पटेल व बांबू हे समीकरण झाले असून कधीही न थांबणारा नेता अशी पाशा पटेल यांची ओळख असल्याचेही ते म्हणाले.प्रास्ताविक करताना पाशा पटेल यांनी बांबू लागवडीचे फायदे व उपलब्ध बाजारपेठेची माहिती दिली. पर्यावरण रक्षणासोबतच शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीचा मार्ग बांबूने उपलब्ध करून दिला आहे.नव्याने सुरू होणाऱ्या बांबू फर्निचर उद्योगासाठी पुढील दोन महिन्यात ११ सीएनसी मशीन बसविण्यात येणार असून या माध्यमातून फर्निचर उद्योग गतिमान होणार असल्याचे ते म्हणाले. प्रारंभी मान्यवरांनी स्व. गोपीनाथराव मुंडे, डॉ.एपीजे अब्दुल कलाम व भारतरत्न लता मंगेशकर यांना आदरांजली अर्पण केली. पाशा पटेल, परवेज पटेल, अमर पटेल, किशोर साळुंके यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. या कार्यक्रमास जिल्हाभरातून आलेले शेतकरी, भाजपा कार्यकर्ते व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### पंतप्रधानांच्या वक्तव्या विरोधात लातूर...

सुभाष घोडके, दगडूअप्पा मिटकरी, वर्षा मस्के, कल्पना मोरे, लक्ष्मी बटनपूरकर, सुलेखा कारेपूरकर, साहेरा पठाण, मिना टेंकाळे, मदाकीनी शिखरे, गोरोबा लोखंडे, विजयकुमार साबदे, गोरबी बागवान, प्रा.संजय जगताप, इम्रान सय्यद, महेश काळे, ॲड. देविदास बोरुळे पाटील, प्रविण सुर्यवंशी, पुनीत पाटील, रमेश सुर्यवंशी, प्रा.प्रविण कांबळे, जालिंदर बरडे, ज्ञानेश्वर सागावे, असिफ बागवान, गौरव काथवटे, व्यकंटेश पुरी, दत्ता सोमवंशी, सुमित खंडागळे, प्रा.एम.पी.देशमुख, तबरेज तांबोळी, अजय मार्डीकर, बीबीषन सांगवीकर, सुंदर पाटील कव्हेकर, ॲड. बाबा पठाण, अफसरखान, प्रमोद जोशी, कुणाल वागज, कलीम शेख, यशपाल कांबळे, अभिजीत इगे, सिंकदर पटेल, जय ढगे, अराफत पटेल, युसुफ बाटलीवाला, बालाजी झिपरे, अभिषेक पतंगे, अकबर मांडजे, पिष्णूदास धायगुडे, शैलेश भोसले, जफर पटवेकर, प्रसाद ढगे, अशीतोष मुळे, इसरार पठाण, युनुस शेख, धनराज गायकवाड, पवनकुमार गायकवाड, कलीम तांबोळी, अनिता कांबळे, सुरेश गायकवाड, अराफत पटेल, अक्षय मुरळे, गोविंद केंद्रे,श्रावण मस्के, मारूती बानाटे याच्यासह कॉंग्रेस पदाधिकारी, विविध सेलचे पदाधिकारी कार्यकर्ते व सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.

### महात्मा बसवेश्वरांच्या समता, प्रेम...

म्हणाले की अध्यात्म एक अद्भुत शक्ती असल्याचे सांगून भाव तिथे देव असतो असतो आत्मिक सुखासाठी ध्यान धारणा महत्त्वाची असून मानवतेच्या एकात्मतेसाठी सुख-शांती महत्त्वाची, सत्याला त्याग करणे म्हणजे धर्म होय. वीरशैव लिंगायताची पंच पिठे असून त्याद्वारे संबंध मानवजातीच्या विश्वशांतीचा संदेश देत असल्याचे सांगितले. याप्रसंगी स्मारक समितीचे अध्यक्ष गणेश हाके, माजी मंत्री विनायकराव पाटील, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, अपंग सेलचे रामदास पाटील, नगराध्यक्षा अश्विनीताई कासनाळे, सभापती शिवानंद हेंगणे, बसव ब्रिगेडचे अविनाश भोसीकर आदीचे समायोचीत भाषणे झाले. यावेळी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे आशीर्वचन झाले व अध्यक्षीय समारोप आमदार बाबासाहेब पाटील यांनी केले. प्रास्ताविक महात्मा बसेश्र्वर समितीचे सचिव साम बाप्पा महाजन यांनी केले यांनी सूत्रसंचालन रामलिंग तत्तापूरे, रंजीत चौधरी यांनी तर आभार एडवोकेट भारत चामे यांनी मानले.या सोहळ्याचा शुभारंभ संत शिरोमणी मन्मथ माउली व राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व जगद्गुरु भीमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पाद्यपूजन करण्यात आला यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रदेश सदस्य सोमेश्वर कदम, राजकुमार मजगे, नगरसेवक सर्वश्री फुजेल जाहागीरदार, डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, संदीप चौधरी, राहुल शिवपुजे, सय्यद सरवरला, महानंदा डावरे, अनुराधा नळेगावकर, मुन्ना सय्यद, ओमप्रकाश पुणे, शरण चंवडा, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष विकास महाजन, प्रा.विश्वभंर स्वामी, सुभाष शेटकार सह महिला व बसव प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सेवालयात अनाथ मुलांना मोफत ...

विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रशिक्षण केंद्रासाठी आर्थिक मदत केल्याबद्दल वाल्सल्य ट्रस्टचे आभार मानले. यावेळी वात्सल्य ट्रस्टचे कार्यवाह श्रीकांत जोशी यांनी अनाथ मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. सेवालयात प्रशिक्षण पूर्ण करणार्या मुलांना नोकरी व व्यवसायासाठी मदत करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.वात्सल्य ट्रस्टचे कर्मचार्यांनी १ हजार २५० अर्भक अनाथ मुलांना दत्तक दिल्याचे सांगितले. मुंबईसह अनेक ठिकाणी संस्था काम करीत असल्याचे ते म्हणाले. सेवालय ट्रेनिंगचे समन्वयक प्रणील नागुरे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी वातसल्य ट्रस्टचे गिरीश कुलकर्णी, अजित पाटील, डॉ. अर्चना चौधरी, महेश पत्रिके, अलोक मालू, मारोती मगर, शांतेश्वर मुक्ता, नवनाथ सूर्यवंशी, विनित भावसार उपस्थित होते.

क्राईम संध्या सोमवार दि. १४ फेब्रुवारी २०२२ ते रविवार दि. २० फेब्रुवारी २०२२ लातूर/पालघर/सोलापूर www.crimesandhya.com ७

# भिवंडीत पोलीस पकडण्यासाठी गेलेल्या चोराचा संशयास्पद मृत्यू

## नागरीकांनी घातला गोंधळ



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरातील शांतीनगर परिसरातील पिराणी पाडा या इराणी नागरीकांच्या वस्तीत एका अट्टल चैन स्नाचिंग करणाऱ्या चोरट्यास पकडण्यासाठी पोलीस पथक रात्री गेले असता त्यांच्यात झटपट होऊन तो आपल्या भावाच्या ताब्यात असताना त्याचा अचानक मृत्यू झाल्याने त्याच्या कुटुंबियांसह स्थानिक नागरीकांनी पोलीसांच्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याचा आरोप करीत गोंधळ घालून मृतदेह घेऊन जाण्यास अडथळा केला .त्यानंतर स्थानिक पोलीसांसह राज्य राखीव दलाच्या तुकड्या परिसरात तैनात करून मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी मुंबई जेजे रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. सादिक कंबल जाफरी असे मृत चोरट्याचे नाव आहे.

सादिक कंबल जाफरी हा अट्टल चैन स्नाचिंग करणारा चोरटा असून त्याच्यावर अनेक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असून तो गुरुवारी रात्री पिराणी पाडा या इराणी वस्ती असलेल्या ठिकाणी आपल्या घरी आला असल्याची माहिती स्थानिक शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांना मिळाली असता त्यांनी पोलीस पथकासह त्या ठिकाणी त्यास ताब्यात घेण्याची कारवाई किली असता पोलीस व चोरट्या मध्ये झटापट होऊन तो पळाला व आपल्या भावाच्या घरात आश्रयाला गेला असता त्या ठिकाणी काही वेळाने तो मयत झाल्यानंतर कुटुंबियांसह स्थानिक नागरीकांनी पोलिसांच्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याचा आरोप करीत मृतदेह घेऊन जाण्यास अटकाव केला.त्यानंतर मोठ्या प्रमाणावर जमाव जमून पोलिसांना विरोध वाढल्यामुळे स्थानिक पोलीसांसह राज्य राखीव दलाच्या तुकड्या घेऊन पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील वडके, प्रशांत ढोले यां सह मोठा पोलीस फौजफाटा घेऊन त्या ठिकाणी दाखल होत जमावास पांगवुन तेथील तणाव आटोक्यात आणून मृतदेह ताब्यात घेत सुरवातीला आयजीएम उपजिल्हा रुग्णालय येथे आणण्यात आला.

या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करून कुटुंबियांच्या मागणी नुसार मृतदेह शवविच्छेदना साठी जे जे रुग्णालय मुंबई येथे रवाना केले असल्याचे सांगत मृत्यूचे कारण स्पष्ट झाल्या नंतर उचित कारवाई करण्यात येईल अशी माहिती भिवंडी पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी दिली आहे.

# मराठा सेवा संघाच्या उद्योजक कक्षाची कार्यकारिणी जाहीर

**लातूर/प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ प्रणित उद्योजक कक्षाची कार्यकारिणी रविवारी मराठा सेवा संघाच्या कार्यालयात जाहीर करण्यात आली. यामध्ये जिल्हाध्यक्षपदी निखिल मोरे, जिल्हा कार्याध्यक्ष आशिष गायकवाड तर विष्णुदास जाधव, मिथुन दिवे, नेहरू देशमुख यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच सोशल मीडिया प्रमुख पदी जयंत जाधव यांची निवड करण्यात आली. यावेळी हंसराज जाधव, प्रदेश सदस्य वैभव तळेकर, प्रदेश उपाध्यक्ष अनंत गायकवाड, मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष रोहन जाधव, जिल्हा कार्याध्यक्ष ऋषिकेश कदम यांची उपस्थिती होती.

# देवणीत असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्ष प्रवेश



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहरातील मुस्लीम सामाजातील व इतर समाजबांधवाचे गुरुवारी कृषी उत्पन्न बाजार समीतीच्या सभागृहात मान्यवरांच्या उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात असंख्य कार्यकर्त्यानी पक्ष प्रवेश केला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शांतविर कन्नाडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष पंडीतराव धुमाळ, जेष्ठ नेते इंजि विनायक बगदुरे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष डॉ. अनिल इंगोले, राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे प्रदेश महासचिव प्राचार्य फकरोद्दिन बुदरे, तालुका कार्याध्यक्ष अनिल कांबळे, अमरदिप बोरे, जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव, लक्ष्मण रणदिवे, उल्हास सुर्यवंशी, महेश चव्हाण, दत्ता चाळकापुरे आदि मान्यवरांच्या उपस्थित खालील कार्यकर्त्यानी शरद पवार साहेबांचे विचार पटल्याने व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी देवणी शहरासह तालुक्यात बळकट करण्यासाठी पक्ष प्रवेश केले आहेत.

यावेळी मुक्तार भाई तांबोळी, सावरगाचे उपसरपंच पंढरी जोडदापके, ग्राम पंचायत सदस्य काशिनाथ मुंगे, शकिल मनियार, कृष्णा पिंजरे, उंटवाले उबेद, उंटवाले फैजल, उंटवाले तय्यब, शेख मुसा (एम डी) सत्तार खुरेशी, नावदगे शिवकुमार यांच्या सह असंख्य कार्यकर्त्यानी पक्ष प्रवेश केले. थोड्याच दिवसानंतर नवाब मलीक यांच्या नेतृत्वाखाली देवणी शहरात शेकडो दलीत, अल्पसंख्याक व आठरा पगड जातीतील सुजान नागरीकांचा पक्ष प्रवेश होणार आहे. या कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्य फकरोद्दीन बुदरे, यांनी केले होते, तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.डॉ. अनिल इंगोले यांनी केले, तर सुत्रसंचलन अमरदिप बोरे यांनि केले आभार प्राचार्य फकरोद्दीन बुदरे यांनी मानले.

# डॉ. पांडुरंग कलंबरकर व एमबीबीएसला लागलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार



**देवणी/प्रतिनिधी**

दिनांक १० फेब्रुवारी रोजी सकाळी बोरोळ येथील नाथ मंदीरावर माजी सरपंच शिवाजीराव शेंडगे यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते. महाप्रसाद आणि आरती चा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव अभय साळुंके यांनी लाभ घेऊन बोरोळ प्राथमिक आरोग्य केंद्र कुटुंब शस्त्रक्रियात महाराष्ट्रात पहिल्या नंबरवर आल्याने डॉ पांडुरंग कलंबरकर यांचा आणि एम बी बी एस ला लागले विद्यार्थी अश्विनी प्रशांत पाटील, आर्या अनिल कोयले, गणेश व्यंकट पाटील आणि दत्ता उध्दव बोबडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आजीत बेळकोणे देवणी तालुका काँग्रेस अध्यक्ष, देवणी नगर पंचायतीच्या नगरसेविका शारदा लांडगे, सेवा दलाचे प्रदेश सचीव धनराज टेकाळे, देवणीचे माजी सरपंच बाबुराव लांडगे, तानाजी बालुरे, प्रमोद जवळदापके, लासोनचे सरपंच धनराज मठपती, उपसरपंच ज्ञानेश्वर शेंडगे, नामदेव मुराळे, निळकंठ भोसले, विजयकुमार कोयले, प्रदीप पाटील, प्रताप कोयले, प्रा. राहुल बालुरे, दत्ता हुरुचनाळे, सुनील शेंडगे, दिपक खुळे, संभाजी बालुरे सह आदिंची उपस्थिती होती.

# देवणी नगराध्यक्षपदी किर्ती घोरपडे, तर उपनगराध्यक्षपदी अमित मानकरी बिनविरोध

**देवणी/प्रतिनिधी**



नगरपंचायतच्या नगराध्यक्ष पदी किर्ती घोरपडे तर उपनगराध्यक्षपदी अमित मानकरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.बुधवारी झालेल्या निवडसभेत ही निवडप्रक्रिया पार पडली. नगरपंचायत मध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी आघाडीचे स्पष्ट बहुमत असल्याने नगराध्यक्ष पदासाठी किर्ती घोरपडे यांचा तर उपनगराध्यक्ष पदासाठी अमित मानकरी यांचे एकमात्र नामनिर्देशन पत्र दाखल झाल्याने या दोघांचीही निवड बिनविरोध झाल्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी देवणी नगरपंचायतच्या वतीने नुतन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवकांचा यथोचीत सत्कार करण्यात आला. या निवड प्रक्रियेसाठी पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी शोभा जाधव तर सहाय्यक म्हणून तहसिलदार सुरेश घोळवे, मुख्याधिकारी सुंदर बोंदर यानी काम पाहीले. नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष निवडीनंतर सर्वच नगरसेवक व पत्रकार बांधव यांचा प्रा. रेवण मळभागे यांनी सत्कार सोहळ्याचे आयोजन करुन सत्कार केला. यावेळी काँग्रेसचे जेष्ठ नेते मल्लिकार्जुन मानकरी, भगवानराव पाटील विजयनगरकर, राकाँचे तालुकाध्यक्ष तथा नगरसेवक प्रा.डा अनिल इंगोले, संजय गांधी निराधार समितीचे वैजनाथ लुल्ले, काशिनाथ मानकरी, जावेद तांबोळी, अँड महादेव मळभागे, बाबुराव लांडगे, बालाजी वळसांगवीकर, अनिल कांबळे, महेश जाधव अमर मुर्के, लक्ष्मण रणदिवे, दत्ता चाळकापुरे डॉ. संजय घोरपडे, अमरदीप बोरे आदीची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत मोटेरावे यांनी केले.

# चाकुरचे नगराध्यक्ष कपिल माकणे यांचे आ. रमेशआप्पा कराड यांनी केले अभिनंदन



**चाकूर/प्रतिनिधी**

चाकूर नगरपंचायतीच्या नूतन नगराध्यक्षपदी कपिल माकणे आणि उपनगराध्यक्ष भाजपाचे अरविंद बिराजदार यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी पुष्पगुच्छ देवून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपाचे किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस दिलीपराव देशमुख, जिल्हा सरचिटणीस विक्रम शिंदे, भाजपा बुद्धिजीवी सेलचे जिल्हा संयोजक विजय शिरसागर, नगरसेवक साईप्रसाद हिप्पाळे, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी पाटील, चाकुर तालुका अध्यक्ष शिवाजी बैनगिरे, सिद्धेश्र्वर पवार, नितीन रेड्डी, प्रशांत बिबराळे, रुपेश कोरमुळे, चाकुरचे भाजपा प्रभारी शंकर रोडगे यांच्यासह अनेक जण होते.

# सोलापूर येथील नांदणी जवळ ३८ लाखांचा गुटखा जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

कर्नाटक राज्यातून बेकायदेशीररित्या गुटखा व पानमसाला एका टेम्पोमधून आणताना सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने पकडला असून ३८ लाखांचा गुटखा व १० लाखांचा टेम्पो असा एकूण ४८ लाख १६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. नांदणी येथे सोलापुर विजयपुर महामार्गावर सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस रात्रगस्त झाले होते. त्यांना विजयपूर येथून एका टेम्पोतून गुटखा सोलापुरात आणण्यात येत आहे अशी गोपनीय माहिती मिळाली. यावेळी नांदणी शिवारात भागवत पेट्रोल पंपाजवळ बातमीतील एक टेम्पो थांबल्याचे दिसले. यावेळी पोलिसांना संशय आल्याने त्यांनी टेम्पोचालक जबीउल्ला सौदुसाब पाटील (४३) याच्याकडे विचारपूस केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. यावेळी पोलिसांनी दोन पंचांसमक्ष टेम्पोची झडती घेतली असता त्यात ३० लाख ५२ हजार ८०० रुपये किमतीचा हिरा पानमसाला गुटखा, ७ लाख



६३ हजार २०० रुपये किमतीचे रॉयल जर्दा आणि १० लाखांचा टेम्पो (एमएच ०४ जीआर १८५७) असा एकूण ४८ लाख १६ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच ट्रक चालक व त्याचा साथीदार यांना जागीच ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील कायदेशीर कारवाई करून त्यांच्यावर मंद्रुप पोलीस ठाण्यात गुरनं २०/२०२२ भादंवि क ३२८, १८८, २७२, २७३,३४ अन्न व सुरक्षा मानदे कायदा क २६ (२)(i) २६(ii),२६(२) (iv)सह क २७ (३)(श) वगैरे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अमित सिद-पाटील, सहाय्यक फौजदार शिवाजी घोळवे, नीलकंठ जाधवर, हवालदार संदीप काशीद, प्रकाश कारटकर यांनी केली आहे.

# १० आरोपींसह १० बाईक दोन रिक्षा व सोन्याचे दागिने जप्त



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडीत वाहन चोरीसह घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याने पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी परिमंडळ दोन मधील पोलीस ठाणेतील अधिकारी व अंमलदार यांना आपआपले पोलीस ठाणे हद्दीत सतर्क राहण्याचे आदेश दिल्या नंतर शांतीनगर पोलीस ठाण्याचे आणि शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी घरफोडीचे व वाहन चोरीचे ९ गुन्हे उघडकीस आणले असुन दहा आरोपीतांना ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून घरफोडी प्रकरणातील ३ लाख ९८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असू वाहन चोरीतील १ लाख ८५ हजार रुपये किंमतीची वाहने असा एकूण ५ लाख ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून दहा जणांना अटक केली असल्याची माहिती भिवंडी पोलीस आयुक्त योगेश चव्हाण यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली आहे. शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११० ग्राम वजनाचे ३ लाख ३० हजार रुपये किंमतीचे दागिने, १ रिक्षा ३ मोटर सायकल, १५०० रुपये किंमतीचे पितळी रॉड तर १७ हजार रुपये किंमतीचे ट्रॅक पँटचे अशा सात चोरीचे गुन्हे तर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक रिक्षा व एक मोटर सायकल असे दोन गुन्हे अशा प्रकारे शहर व शांतीनगर पोलीस ठाण्यात एकूण ९ गुन्ह्यांचा तपास भिवंडी पोलिसांनी लावला असून याप्रकरणी दहा जणांना अटक केली असल्याची माहिती पोलीस उपायुक्त चव्हाण यांनी दिली आहे.

# वाडा तालुक्यात निवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत यांचे मार्गदर्शन शिबीर



**वाडा/प्रतिनिधी**

सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे संस्थापक, अध्यक्ष, माजी खासदार, माजी आमदार निवृत्त ब्रिगेडियर सुधीर सावंत यांनी जिल्ह्यातील आजी माजी सैनिक, विद्यार्थी, पालक, शेतकरी बांधव व नागरिकांसाठी वाड्यातील पी.जे. महाविद्यालयात सोमवारी (७ फेब्रुवारी) मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते.

याप्रसंगी नव तरुण, तरुणींना सैनिक भरतीसाठी आवाहन करून लवकरच पालघर जिल्ह्यात त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणार असल्याचे सांगत जिल्ह्यात दहा हजार झाड लावण्याचा मानस असल्याचे सांगितले. यावेळी सैनिक फेडरेशनचे डी. एफ.निंबाळकर, पालघर जिल्हा अध्यक्ष निलेश पाटील, ठाणे जिल्हा अध्यक्ष राजू पाटील, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष किसन बोन्द्रे, शालेय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण सोनटक्के उपस्थित होते. सदर कार्यक्रमा दरम्यान जिल्हा व तालुका प्रतिनिधींची प्रमाणपत्र देऊन नियुक्ती करण्यात आली.

## थोडक्यात वृत्तांत

### भिवंडीत हभप बळीराम पाटील यांचे निधन



भिवंडी : तालुक्यातील वळपाडा येथील वारकरी संप्रदायातील जैष्ठ हभप बळीराम दादाजी पाटील यांचे वायच्या ८६ व्या वर्ष अल्प आजाराने शुक्रवारी निधन झाले आहे. त्यांच्यावर गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच वारकरी संप्रदायातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांची दशक्रिया विधी २० फेब्रुवारी रोजी काल्हेर येथील रेतीबंदर येथे होणार असून उत्तरकार्य २३ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजता राहत्या घरी कैलास नगर वळपाडा येथे होणार आहेत. हभप बळीराम पाटील यांनी अनेक वर्षे वारकरी संप्रदायाची सेवा केल्याने ते तालुक्यात सर्वत्र परिचित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. भिवंडीतून प्रसिद्ध होणारे दै.स्वराज्य तोरणचे संपादक किशोर पाटील यांचे ते वडील होते.

### वसुरी गावाच्या हद्दीत मिनी टेम्पोला आग



वाडा : वाडा तालुक्यातील कुडूस फाटा ते कंचाड फाटा दरम्यान असलेल्या वसुरी गावाच्या हद्दीत टाटा ऐस या मिनी टेम्पोला शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याने मोठे नुकसान झाले आहे. मंगळवारी (दि.९ फेब्रुवारी) संध्याकाळच्या सुमारास ही आग लागली, शॉर्टसर्किट मुळे आगल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. आग लागल्याचे समजताच चालकाने प्रसंगावधान राखत गाडीतून बाहेर पडल्याने त्याला काहीही दुखापत झाली नाही, मात्र आगीमुळे टेम्पोचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गाड्यांना, कंपन्यांना आग लागण्याचे प्रकार काही नवीन नाहीत, अशा घटना तालुक्यात वारंवार होत असल्याने पुन्हा एकदा अग्निशमन वाडा तालुक्यासाठी अग्निशमक दलाची मागणी होत आहे.



### राष्ट्रवादीकडून हिजाब समर्थानात निदर्शने

भिवंडी : कर्नाटक राज्य सरकारने मुस्लिम विद्यार्थिनींना शैक्षणिक संकुलात हिजाब घालण्यास मनाई केली असून त्या विरोधात कर्नाटक राज्यात तीव्र पडसाद उमटत असल्याने तेथील महाविद्यालय शाळा तब्बल तीन दिवस बंद ठेवण्यात आल्या आहेत. तर हिजाब विरोधात भगवी शाल आंदोलन जोर धरत असताना महाराष्ट्रात हिजाबच्या समर्थनात निदर्शने सुरू केली असून भिवंडीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष शोएब खान गुड्डू यांच्या नेतृत्वाखाली कर्नाटक सरकार विरोधात हिजाब समर्थनात निदर्शने करण्यात आली. यावेळी महिला शहराध्यक्षा स्वाती कांबळे, माजी शहर कार्याध्यक्ष प्रविण पाटील सह अनेक कार्यकर्त्यासह अनेक विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. यावेळी या मोर्च्याने उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे जाऊन हिजाबच्या समर्थनात कर्नाटक सरकारचा निषेध करणारे निवेदन दिले आहे.

### प्रतिबंधित मंगुर मासा संवर्धन करणाऱ्यांना अटक

वाडा: पर्यावरणासह मत्स्यजातीला अत्यंत घातक असलेल्या मंगूर माशाची प्रजाती नष्ट करण्याचे आदेश सरकारने दिले असून या माशांच्या उत्पत्तीवर पूर्णपणे बंदी आहे. वाडा तालुक्यातील गौरापूर गावात या माशांचे उत्पादन केले जात असल्याची माहिती मिळताच ७३० किलो मासे नष्ट करण्यात आले आहेत. मांगूर हा माणसाच्या जीवनाला तसेच पर्यावरणाला घातक असणारा मासा असून त्याची मत्स्यबीज केंद्रे आणि त्याचा तलावातील मत्स्यसाठा नष्ट करण्याचा आदेश असतानाही गौरापूर या गावात कृत्रिम तलाव तयार करून त्यामध्ये माशांचे उत्पादन घेतले जात होते. याबाबत पालघर मत्स्य विभागाला माहिती मिळताच विभागाने ७३० किलो मासे नष्ट करून माशांचे संवर्धन केल्याप्रकरणी पाच जणांविरोधात वाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वैद्यकीय क्षेत्रातील बांधवाचे आंदोलन हे सरकारचे अपयश –आ.संभाजी निलंगेकर



**लातूर/प्रतिनिधी**

कोरोनाच्या संकट काळात ज्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता रुग्णसेवा दिली त्याच वैद्यकीय क्षेत्रातील बांधवाना आंदोलन करण्याची वेळ येते हे सरकारचे अपयश असल्याचे सांगून वैद्यकीय शिक्षकांनी ज्या मागण्यांसाठी आंदोलन सुरु केलेले आहे त्या मागण्या अतिशय रास्त असल्याचे आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले. त्याचबरोबर त्यांच्या या मागण्या पुर्ण करुन देण्यासाठी आगामी अधिवेशनात आवाज उठविण्यात येऊन या करिता शासन दरबारी पाठपुरावा ही करण्यात येईल अशी ग्वाही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी यावेळी दिली. महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटनेच्या वतीने त्यांच्या विविध मागण्याकरीता संपुर्ण राज्यभरात विविध ठिकाणी असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात आंदोलन सुरु केलेले आहे.

लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात संघटनेच्या वतीने सुरु असलेल्या आंदोलनास भेट देत आ. निलंगेकरांनी त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांच्यासोबत भाजपा शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, प्रदेश प्रवक्ता प्रेरणा होनराव, युवा मोर्चा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, मनपा गटनेते ॲड. शैलेश गोजमगुंडे, स्थायी समिती सभापती ॲड. दिपक मठपती आदींसह नगरसेवक व पदाधिकारी यांची उपस्थिती होती. रुग्णसेवा हीच ईश्र्वर सेवा समजून कार्यरत असलेल्या वैद्यकीय बांधवांचे कोवीडच्या संकट काळातील योगदान अतिशय अमुल्य होते असे सांगत या संकट काळात वैद्यकीय सेवेचे महत्व अधिक अधोरेखीत झाल्याचे आ. निलंगेकरांनी सांगितले. जे बांधव संकट काळात धाऊन जातात त्याच बांधवांवर आता संकट आलेले असताना सरकार मात्र त्यांच्याकडे सपशेल दुर्लक्ष करीत आहे. त्यांच्यावर आंदोलन करण्याची वेळ येती हे सरकारचे अपयश असून या माध्यमातून सरकारचा नाकर्तेपणा उघडा पडलेला आहे. विशेष म्हणजे मागण्यासंदर्भात संघटनेचे पदाधिकारी ज्यावेळेस सचिवांकडे चर्चेसाठी गेले त्यावेळी ...पान ६ वर



देवणी येथे 'क्राईम संध्या डायरी २०२२चे प्रकाशन करताना जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पंडीतराव धुमाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रा.डॉ. अनिल इंगोले, अल्पसंख्याक सेलचे प्रदेश महासचिव फकरोद्दीन बुदरे, सभापती शांतविर कन्नाडे, तालुका कार्याध्यक्ष अनिल कांबळे, अमरदिप बोरे, महेश जाधव, लक्ष्मण रणदिवे, मुक्तार भाई तांबोळी, कृष्णा पिंजरे, पंढरी जोडदापके, काशिनाथ मुंगे सह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.



क्राईम संध्या साप्ताहीकाच्या वतीने काढण्यात आलेल्या लातूर जिल्हा दैनंदिन डायरी २०२२ भेट देताना घरणी येथे तैनात आसलेले हायवे ट्राफिक पोलीस कर्मचारी संगमे, शेख, गायकवाड, धोपटे, पांचाळ, बोटेवाड क्राईम संध्या साप्ताहीकाचे अहमदपूर तालुका प्रतिनिधी तौसिफ सय्यद.

# 'जैयस्वाल सेवा संस्थे'च्या अध्यक्षपदी आनंद जैयस्वाल यांची बिनविरोध निवड



**वसई/प्रतिनिधी**

वसई पश्चिम येथील कृष्णा टाऊनशिपमध्ये स्थित कार्यालयात जैयस्वाल सेवा संस्थेची वार्षिक कार्यकारिणी बैठक पार पडली. त्यामध्ये ज्येष्ठ समाजसेवक आनंद जैयस्वाल यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. समाजाच्या प्रगतीत त्यांचे विशेष योगदान आहे. त्याच स्थानिक उत्तर भारतीयांमध्ये आनंद व्यक्त केली जात आहे. जैयस्वाल सेवा संस्थेची स्थापना २०१३ साली झाली. या काळात केवळ ४ लोक संस्थेची पायाभरणी करून समाज जोडण्याचे काम करत होते. संस्थेत २ हजार लोक जोडलेले आहेत. तसेच मीरारोड ते वसई, विरार, पालघर, डहाणू आदी ठिकाणी विविध सामाजिक–सांस्कृतिक कामे केली आहेत. अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताना आनंद जैयस्वाल म्हणाले की, या संस्थेच्या स्थापनेची प्रेरणा मिळाली. मी मुंबईत जैयस्वाल समाजाचा सदस्य असताना माझ्याकडे एका मोठ्या कार्यक्रमाला गेलो होतो. तिथे मला समाज सामील होताना दिसला. त्यामुळे मी खूप प्रभावित झालो आणि वसईत राहणाऱ्या माझ्या जैयस्वाल समाजाच्या लोकांना एकत्र आण्याच्या कामात सहभागी झालो. पूर्वी आम्ही चौघे होतो, पण आता वटवृक्ष झाला आहे. संघटनेच्या लोकांनी मला पुन्हा अध्यक्षपद दिले. माझ्यावर दिलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करणार आहे. याशिवाय समाजातील तरुणांना पुढे नेण्याचा माझा पहिला उद्देश असून संस्थेच्या नावावर जिल्ह्यात जमीन खरेदी करण्याचा माझा पहिला उद्देश असल्याचेही जैयस्वाल यांनी सांगितले. संस्थेच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच लोकांना उपयुक्त ठरू शकते. बैठकीदरम्यान लक्ष्मणचंद जैयस्वाल, मनोज जैयस्वाल, ...पान ६ वर

# सामूहिक शेतीतून बांबू लागवड शक्य –पंकजाताई मुंडे



**लातूर/प्रतिनिधी**

सामुहिक शेती हे माझे स्वप्न आहे. अल्पभूधारक किंवा भूमिहीन शेतकऱ्यांसाठी ते वरदान आहे.सामूहिक शेतीत रोहयोच्या माध्यमातून बांबू लागवड करणे शक्य आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या पदरात अधिकचे चार पैसे पडतील, असे मत भाजपा नेत्या माजीमंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,लातूर अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रच्या पतपुरवठ्यातून कलाम कृषी शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड अंतर्गत औसा तालुक्यातील लोदगा येथे उभारल्या जाणार्या जगातील पहिल्या स्वयंचलित बांबू फर्निचर उद्योगाच्या भूमिपूजन प्रसंगी पंकजाताई मुंडे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यावरण राज्यमंत्री संजय बनसोडे तर व्यासपीठावर आ.अभिमन्यू पवार, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल केंद्रे, बँक ऑफ महाराष्ट्राच्या झोनल मॅनेजर के. दुर्गा सुनिता, माजी आमदार पाशा पटेल, नितीन कोतवाल, कृषी खात्याचे अधिकारी क्षिरसागर, लोदग्याचे सरपंच पांडुरंग गोमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, सामूहिक शेतीचे स्वप्न मी बालपणापासून पाहिले आहे. ज्यांना अत्यंत कमी जमीन आहे, जे भूमिहीन आहेत ते इतरांच्या शेतात रोजगारासाठी जातात. सामूहिक शेती झाली तर त्यांना अधिक उत्पन्न मिळू शकते. पंकजाताई म्हणाल्या की, शेतकऱ्याला अधिक उत्पन्न मिळावे यासाठी पाशा पटेल यांनी आजपर्यंत लढा दिला आहे.आता ते बांबू या विषयात काम करत आहेत. शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून सर्वांनीच काम केले पाहिजे. शेतकऱ्याला शेती करण्याची लाज वाटू नये,त्याच्या मुलांनाही शेतीत काम करावे असे वाटावे. शेतकऱ्याच्या मुलाला मुलगी देताना वधूपित्याने विचार करू नये, असे काम होण्याची आवश्यकता आहे.यासाठी शेती आधारित उद्योग वाढले पाहिजेत असे त्या म्हणाल्या. बांबू लागवडीतून चांगला फायदा होऊ शकतो.शेकडो एकर गायरान जमिनी आजही उपलब्ध आहेत. सामूहिक शेती करत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून या जमिनीवर बांबू लागवड करता येईल.त्यातून शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळू शकेल,असेही पंकजाताई म्हणाल्या. राज्यमंत्री संजय बनसोडे म्हणाले की, बांबू लागवडी ...पान ६ वर

# पंतप्रधानांच्या वक्तव्या विरोधात लातूर काँग्रेसचे आंदोलन




**लातूर/प्रतिनिधी**

देशभर कोरोना पसरवण्यासाठी महाराष्ट्राला जबाबदार धरणाऱ्या आणि मजुरांना कोरोनाचे स्प्रेडर ठरवणाऱ्या मोदींनी महाराष्ट्राची व मजुरांची 'माफी मागावी' यासाठी लातूर येथे काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर निषेध आंदोलन केले आहे. सर्वसामान्य कष्टकरी कामगार लोकांची मदत करणे जर गुन्हा असेल तर होय आम्ही काँग्रेसजनांनी तो गुन्हा केलाय आणि सर्वसामान्य मायबाप कष्टकऱ्यांसाठी आम्ही संकटकाळात वारंवार हा मदत करण्याचा गुन्हा करीत राहणार अशा शब्दात लातूर काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी आपला आक्रोश व्यक्त केला. संसदेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोरोना काळातील आपल्या सरकारचे अपयश आणि कोरोना मृत्यूची जबाबदारी टाळण्यासाठी काँग्रेस आणि महाराष्ट्र सरकार कोरोना वाढीस जबाबदार आहे, असे खोटे बोलून महाराष्ट्राचा अपमान घोर अपमान केला आहे. या उलट नमस्ते ट्रम्प कार्यक्रम घेऊन देशभर भाजप सरकारने कोरोना पसरवला आहे. मोदी आणि भाजपच्या वतीने याच काळात मध्यप्रदेशात सत्तापालट खेळ खेळला गेला. बिहार व इतर राज्यात मोठमोठ्या रॅली व प्रचार सभा घेण्यात आल्या. राहुल गांधींनी कोरोना अति धोकादायक आहे उपाययोजना करा म्हणून सांगितले पण त्यावेळी भाजप नेत्यांकडून त्यांची चेष्टा करण्यात आली. मोदी सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे काळजी न घेतल्यामुळे लाखो लोकांच्या मृत्यू कोरोनामुळे झाला, अनेक मुले अनाथ झाले. महाराष्ट्राला जाणीवपूर्वक रॅमिडिसीवर इंजेक्शन, ऑक्सिजन कमी प्रमाणात देण्यात आला. कोरोना वाढल्यानंतर उपाययोजना करण्या ऐवजी दिवे लावण्याचा, टाळ्या वाजविण्याचा, थाळी वाजविण्याचा कार्यक्रम घेण्यात आला यामुळे सारा देश गर्दी करत रस्त्यावर आला, अशातच अचानक लॉकडाऊन केल्यामुळे मजुरांचे हाल झाले, उपासमार झाली. पायी आपल्या गावी चालत निघालेल्या अनेकांनी आपले प्राण गमावले. या कठीण काळात काँग्रेस पक्ष आपल्या परंपरे प्रमाणे सामान्य माणसा सोबत राहून सर्वांना मदत केली. तरी देखील पंतप्रधान संसदेत खोटे बोलत आहेत याचा काँग्रेस पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला आहे. या आंदोलनात लातूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ॲड. किरण जाधव, अशोक गोविंदपूरकर, लातूर शहर जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्ष प्रा.स्मिता खानापूरे, महिला काँग्रेस सहसचिव सपना किसवे, तालुका काँग्रेस अध्यक्ष...पान ६ वर

# महात्मा बसवेश्वरांच्या समता, प्रेम, बंधुता व न्यायाचा संदेश स्वीकारा –जगतगुरू भीमाशंकर लिंग शिवाचार्य



**अहमदपूर/फिरोज शेख**

मानव विश्वाच्या कल्याणाचा जगत ज्योती महात्मा बसवेश्वरांच्या समता प्रेम बंधूता व न्यायाचा संदेश स्वीकारून संबंध मानवी जीवन कल्याणकारी बनवा असे प्रतिपादन श्री श्री श्री १००८ केदारनाथ रावल रत्न जगद्गुरु भिमा शंकरलिंग शिवाचार्य महास्वामी उत्तराखंड उखी मठ यांनी केले. ते नगरपरिषदेच्या आवारात राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज व्यापारी संकुलात जगत ज्योती महात्मा बसवेश्र्वराच्या अश्वारूढ पुतळ्याच्या भूमिपूजन प्रसंगी आशीर्वचन पर बोलताना व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार बाबासाहेब पाटील होते. व्यासपीठावर श्री राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज, माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी मंत्री विनायकराव पाटील, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, नगराध्यक्षा आश्वीनीताई कासनाळे, महात्मा बसवेश्वर स्मारक समितीचे अध्यक्ष गणेश हाके पाटील, सचिव सांबप्पा महाजन, भाजपा अंपग सेलचे प्रमुख रामदास पाटील, प.स.सभापती गगांसागर जाभाडे,शिवसेना जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी, बसव ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष अविनाश भोसीकर, रिपाइंचे राज्य सचिव बाबासाहेब कांबळे,जिल्हा काँग्रेस अल्पसंख्याकचे सिराजोद्दीन जहागीरदार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवानंद हेंगणे,भाजपा किसान मोर्चा सरचिटणीस दिलिपराव देशमुख, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य चंद्रकांत मदे, उपसभापती बालाजी गुट्टे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष हेमंत पाटील,भाजप तालुका अध्यक्ष हणमंत देवकत्ते, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष शिवाजीराव देशमुख, जिल्हा परिषद सदस्य माधवराव जाधव, जि प सदस्य बसवराज पाटील कौवळखेडकर, चाकूर काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विलास पाटील, नगरसेवक लक्ष्मीकांत कासनाळे, सहसचिव राजाराम वाघमारे, कोषाध्यक्ष प्रदिप वट्टमवार, नगरसेवक अभय मिरकले, पं.स.सदस्य कमलाकर पाटील, सह मान्यवर उपस्थित होते. यावेळी जगत गुरु भीमाशंकर लिंग शिवाचार्य महास्वामी पुढे बोलताना ...पान ६ वर

# सेवालयात अनाथ मुलांना मोफत प्रशिक्षण



**लातूर/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील हासेगाव येथील सेवालय व मुंबईच्या वात्सल्य ट्रस्ट यांच्यावतीने १८ वर्षांवरील अनाथ मुलांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. यात जेसीबी प्रशिक्षणासह सहा विविध कोर्सेसच्या ६० मुलांना मोफत निवासी प्रशिक्षण देण्यात येत आहे. सेवालयात सुरू झालेल्या या प्रशिक्षणाचे उद्घाटन लातूरचे अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी औशाचे गटविकास अधिकारी सूर्यकांत भुजबळ उपस्थित होते. मान्यवरांनी जेसीबी, शिलाई, संगणक, ब्युटी ट्रेनिंगसह नर्सिंगच्या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन केले. बालगृहातील १८ वर्षापुढील अनाथ मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देवून त्यांना स्वावलंबी बनवण्याच्या हेतुने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. अनाथ मुलांना संगोपन व प्रशिक्षणाबरोबरच व्यावसायिक प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. ही मुले संस्थेत राहत असल्याने त्यांच्या मनात एकप्रकारच्या न्यूनगंड तयार झालेला असतो. समजाच्या मुख्य प्रवाहात अनाथ मुलांना सामावून घ्यावयाचे असेल तर त्यांना स्वावलंबी बनवणे गरजेचे आहे, असे सांगून लोखंडे म्हणाले, सेवालयाच्या माध्यमातून वंचित मुलांसाठी काम केले जाते. एचआयव्ही संक्रमित अनाथ मुलांचे पुनर्वसन केले जात आहे. आम्ही सेवालयाच्या पाठीशी खंबीरपणे असून समाजानेही हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. सुरुवातीच्या काळात सेवालय प्रकल्पाला झालेला विरोध मी ऐकला आहे. वंचित घटकांसाठी होत असलेल्या कामाला मदत करता येत नसेल तर किमान विरोध तरी करायला नको, असे म्हणत औशाचे गटविकास अधिकारी भुजबळ म्हणाले, लहान मुले आता मोठी झाली आहेत. त्यांचे विवाह लावण्यात आले आहेत. त्यांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी प्रशासकीय पातळीवरून आम्ही प्रयत्न करू, असे ते म्हणाले. सेवालयाचे प्रमुख प्रा. रवी बापटले यांनी सेवालयात राबविण्यात येणाऱ्या ...पान ६ वर

# वाडा येथे काँग्रेस पार्टीकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निषेध



**वाडा/प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी संसदेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर झालेल्या चर्चेला उत्तर दिले. यावेळी काँग्रेस पक्ष त्यांच्या निशाण्यावर राहिला, कोरोना विषयावर बोलताना त्यांनी महाराष्ट्र काँग्रेस पक्षामुळेच देशात कोरोना वाढला असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्याचा काँग्रेस पक्षाकडून तीव्र निषेध व्यक्त होत आहे. पालघर काँग्रेस कमिटीचे जिल्हा अध्यक्ष प्रफुल पाटील व वाडा तालुका काँग्रेस कमिटीचे वाडा तालुका अध्यक्ष दिलीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी बुधवारी (दि.९ फेब्रुवारी) वाड्यातील खंडेश्वरी नाका येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात घोषणा देऊन निषेध केला.